
cmyk



दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....

चंद्राला चंदन देवाला वंदन,
भाऊ बहीनीचं प्रेम म्हणजे..रक्षाबंधन
रक्षाबंधनाच्या मनःपूर्वक शुभेच्छा
-संपादक

बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–११८ | सोमवार दि.१९ ऑगस्ट २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | • पाने– ६ | किंमत ३ रूपये

# राज्यस्तरीय कृषी महोत्सवाची परळीत जय्यत तयारी

## मुख्यमंत्र्यांसह दोन्ही उपमुख्यमंत्री येणार, शेतकरी उपयोगी अनेक उपक्रमाचे आयोजन–धनंजय मुंडे

**परळी वै.। प्रतिनिधी**

**महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागातर्फे येत्या २१ ऑगस्ट पासून बीड जिल्ह्यातील परळी वैद्यनाथ येथे पाच दिवसीय राज्यस्तरीय कृषी महोत्सव आयोजित करण्यात आला असून या कृषी महोत्सवात भव्य राज्यस्तरीय कृषी प्रदर्शन पशुप्रदर्शन त्याचबरोबर राज्यभरातील शेतकऱ्यांना मार्गदर्शक ठरतील अशा अनेक महत्त्वपूर्ण उपक्रमांचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी दिली आहे.**



राज्यातील शेतकऱ्यांसाठी कृषी विभागाने कृषी विद्यापीठांच्या माध्यमातून लावलेले नवनवीन शोध, विविध आधुनिक उपकरणे, शासनाचे व अन्य नवनवीन उपक्रम तसेच विविध उत्पादने यांची माहिती खरेदी करता यावे या दृष्टीने महोत्सव अत्यंत महत्त्वाचा व शेतकऱ्यांना लाभदायक असून, या महोत्सवाचे उद्घाटन २१ ऑगस्ट रोजी दुपारी १२ वा. केंद्रीय कृषीमंत्री शिवराज सिंह चौहान, राज्याचे मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते करण्यात येणार आहे. या कृषी महोत्सवाच्या निमित्ताने विविध आधुनिक यंत्र सामुग्री, ड्रोन फवारणीची प्रात्यक्षिके, नवनवीन संशोधन, चर्चासत्रे तसेच विविध उत्पादने, पशूंच्या विविध प्रजाती यांसह अनेक अर्थांनी हा महोत्सव महत्वपूर्ण ठरणार आहे.

◀◀ पान २ वर

# आरक्षण संपवणे हीच मोदींची गॅरंटी

## आयएएसचे खासगीकरण करण्याचा प्रयत्न, राहुल गांधी यांचा आरोप

**नवी दिल्ली। वृतसंस्था**

**केंद्रीय गृहमंत्रालयाने काही दिवसांपूर्वी केंद्र सरकारच्या प्रशासनातील काही महत्वाच्या पदांवर आयएएस अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्याची आवश्यकता होती. मात्र या रिक्त आयएएसच्या जागांवर मर्जीतील व्यक्तींची नियुक्ती करण्यासाठी एक अध्यादेश काढत, अशा रिक्त पदांवरील व्यक्तींची नियुक्ती मागील दाराने करण्याचा मार्ग मोकळा केला, असा आरोप करीत नरेंद्र मोदी यांनी केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या ऐवजी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या माध्यमातून नोकर भरती करण्याचा प्रयत्न सुरु केला असल्याचे राहुल गांधी यांनी म्हटले आहे.**

राहुल गांधी ट्विटमध्ये म्हणाले की, केंद्र सरकार विविध मंत्रालयातील महत्वपूर्ण पदांवर लेटर एंट्री (मागील दाराने नियुक्त्या) करत एससी, एसटी आणि ओबीसी प्रवर्गाचे आरक्षण हिसकावून घेण्याचा प्रयत्न करत आहे. मी नेहमी सांगत आलोय की, वरच्या दर्जाचे प्रशासकीय अधिकारी पदावरील व्यक्तींसह इतर बाकीच्या प्रमुख पदांवर वंचितांना प्रतिनिधीत्व नाही. त्यात सुधारणा करण्याऐवजी लेटरल एंट्रीच्या माध्यमातून त्यांना दूर लोटण्याचे काम करण्यात येत असल्याची टीकाही यावेळी त्यांनी केली.

केंद्र सरकारच्या या निर्णयावर टीका करताना राहुल गांधी म्हणाले की, युपीएससीची तयारी करत असलेल्या युवकांच्या हक्कावर दरोडा आणि त्यांना मिळत असलेल्या आरक्षणाचे हक्क डावलून सामाजिक न्यायाच्या

◀◀ पान २ वर

# महाराष्ट्रात गुलाबी राजकारण!

## अजित पवार यांच्यापाठोपाठ देवेंद्र फडणवीस यांची खास ड्रेसिंग स्टाईल

**मुंबई । प्रतिनिधी**

**महाराष्ट्राच्या राजकारणात गुलाबी बहर आल्याचे चित्र पहायला मिळत आहे. अजित पवार यांच्यापाठोपाठ फडणवीस यांनी देखील आपली ड्रेसिंग स्टाईल काहीशी बदलल्याचे दिसत आहे. अजित पवारांच्या पाठोपाठ देवेंद्र फडणवीसांनाही गुलाबी रंगाची भुरळ पडल्याचे दिसत आहे. तसा बदल देवेंद्र फडणवीस यांच्या ड्रेसिंग स्टाईलमध्ये पहायला मिळत आहे.**

अजित पवारांच्या राष्ट्रवादीने सर्व राजकारणच गुलाबी रंगात रंगवून टाकले आहे. याच गुलाबी रंगाची भुरळ भाजपला देखील पडल्याचे दिसत आहे. मुंबईतील एका कार्यक्रमात राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे अजित पवार यांच्या प्रमाणे गुलाबी जॅकेट परिधान करुन आले. देवेंद्र फडणवीस यांनी अजित पवार यांच्यासारखेच

◀◀ पान २ वर



### फडणवीसांच्या नेतृत्वात भाजपच मिशन १५०

आगामी विधानसभा निवडणुकीसाठी भाजपने पुन्हा एकदा आपले दोन्ही हुकमी एक्के मैदानात उतरवण्याची तयारी केली आहे. महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीत भाजपची संपूर्ण जबाबदारी फडणवीसांच्या खांद्यावर सोपवण्यात येणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. विधानसभेच्या जागा ठरवण्याचे अधिकार फडणवीसांकडे असतील. मतदारसंघात फेरबदल करण्याचे अधिकारही त्यांनी देण्यात आल्याचे समजते. पक्षांतर्गत उमेदवार आणि मतदारसंघ निश्चितीची जबाबदारीही त्यांच्यावरच असेल. महायुतीतल्या मित्रपक्षांशी चर्चा करून निर्णय घेण्याचे अधिकारही फडणवीसांकडे असणार आहेत.

### गुलाबी साडीवाल्या ताईंच्या गुलाबी रिक्षात अजितदादा

अजित पवार यांचा एक फोटो सोशल मिडियावर चांगलाच व्हायरल झाला आहे. या फोटोमध्ये अजित पवार एका गुलाबी साडीवाल्या ताईंच्या गुलाबी रिक्षात बसलेले दिसत आहेत. या रिक्षाची चालक ही महिला आहे. या महिलेच्या हातात गुलाबी रिक्षाचे स्टेअरिंग आहे. अजित पवार प्रवासी म्हणून रिक्षात बसले आहेत. अजित पवार यांच्या जनसन्मान यात्रेतील हा फोटो आहे. तर गुलाबी जॅकेटवर पांढरा गुलाब अजितदादांनी लावलेला आहे.



# मराठा आरक्षणावरून संभाजी भिडेंची पलटी

## आधी पाठिंबा अन् आता मराठा म्हणजे...

**सांगली । प्रतिनिधी**

**संभाजी भिडे यांनी गेल्या काही दिवसांपूर्वी मनोज जरांगे पाटील यांची भेट घेतली होती. त्यावेळी संभाजी भिडे यांनी मनोज जरांगे पाटील यांना पाठिंबा दर्शवत मराठ्यांना आरक्षण मिळायलाच हवं अशी भूमिका मांडली होती. पण आता संभाजी भिडे यांनी मराठा आरक्षणावरून मांडलेल्या भूमिकेवरून युटर्न घेतल्याचे पाहायला मिळत आहे. भिडे गुरुजी यांनी आपली वेगळीच भुमिका मांडला असून याची आता सर्वत्र चर्चा होत आहे.**



दरम्यान, १२ सप्टेंबर २०२३ रोजी मनोज जरांगे पाटील यांची संभाजी भिडे यांनी भेट घेतली होती. त्यावेळी मराठा आरक्षणावरून सुरू असलेल्या उपोषणाला आणि मनोज जरांगे पाटील यांच्या लढ्याला १०० टक्के यश येणार असे म्हटले होते. लवकरात लवकर यश येण्यासाठी या राजकारणी लोकांकडून पाहिजे तसे करून घेण्याची जबाबदारी मनोज जरांगे पाटील यांनी माझ्यावर टाकावी, असे संभाजी भिडे यांनी म्हटले होते. या लढ्याचा शेवट मराठ्यांना आरक्षण मिळण्यातच झाला पाहिजे, असे म्हणत मनोज जरांगे पाटील यांच्यासोबत असल्याचे भिडेंनी म्हटले होते. त्यानंतर त्यांनी आपली भुमिका बदलली आहे. संभाजी भिडे यांनी मराठा आरक्षणासंदर्भातही भाष्य केले आहे.

◀◀ पान २ वर

# शिवसंग्राम पक्षाच्या अध्यक्षपदी ज्योतीताई मेटे

## विधानसभेच्या पाच जागा लढविणार, आघाडी आणि महायुतीसोबतही चर्चा सुरू

**पुणे । प्रतिनिधी**



स्व.विनायकराचे मेटे यांच्या शिवसंग्राम या पक्षाने राज्याच्या राजकारणात आगामी निवडणुकीची जोरदार तयारी सुरू केली आहे. रविवारी पुण्यात शिवसंग्राम पक्षाची सर्वसाधारण सभा पार पडली. यावेळी नवीन कार्यकारणी जाहीर करण्यात आली असून, पक्षाच्या अध्यक्ष म्हणून ज्योतीताई मेटे यांची निवड करण्यात आली. यावेळी निवडणुकीत शिवसंग्राम किमान ५ विधानसभा जागा लढवणार असल्याची माहिती समोर आली आहे. त्याचबरोबर महायुती आणि महाविकास आघाडी या दोघांशी आमची चर्चा सुरू आहे. मुंबई, कोकण, विदर्भ, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र पाच विभागात पाच जागा पाहिजेत असेही यावेळी ज्योती मेटे यांनी म्हटले आहे. ज्योती मेटे यांच्या अध्यक्षेतेखाली सभा पार पडली.

◀◀ पान २ वर

# लाडक्या बहिणींनी डॉ.योगेश क्षीरसागर यांना बांधल्या राख्या!

## बीडमध्ये सन्मान रणरागिनींचा सोहळा; चारशे महिलांना दिल्या साडी–चोळी भेट

**बीड । प्रतिनिधी**

**कल्पतरू प्रतिष्ठान आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या पुढाकारातून रक्षाबंधनाच्या पूर्वसंध्येला बीड शहरातील सौ.के.एस.के. महाविद्यालयाच्या सांस्कृतिक सभागृहात रविवारी (दि.१८) अंगणवाडी सेविका व मदतनीस, पर्यवेक्षिका या लाडक्या बहिणींचा सन्मान सोहळा पार पडला. यावेळी शेकडो लाडक्या बहिणींनी डॉ.योगेश क्षीरसागर यांना राख्या बांधल्या. त्यानंतर साडेचारशेहून अधिक महिलांना साडी–चाळी भेट देऊन डॉ.क्षीरसागर यांनी सन्मान केला.**



यावेळी डॉ.योगेश क्षीरसागर म्हणाले, महिला आघाडीच्या नियोजनातून आजचा कार्यक्रम होतोय. आशा सेविका, मदतनीस यांचे योगदान समाज विसरू शकत नाही. वार्ड, गाव पातळीवर झपाट्याने काम वाढत आहे. परंतु वेतन कमी प्रमाणात आहे. त्यात वाढ करण्यासाठी महायुती सरकार कटिबध्द आहे. माझी

◀◀ पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती,
बीड,दि.१३ ऑगस्ट २०२४

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू : ७.०० क्विंटल | २,३०० | २,६३५ | २,४६८ |
| ज्वारी/हायब्रिड :५९.५० क्विंटल | २,१३१ | २,६०१ | २,३२० |
| मूग :१.५० क्विंटल | ७,७०० | ७,७०० | ७,७०० |
| तूर : २.०० क्विंटल | ७,७०१ | ७,७०१ | ७,७०१ |
| उडीद : २.५० क्विंटल | ४,९०१ | ७,४०० | ६,१५० |
| बाजरी: २८.०० क्विंटल | २,४७१ | ३,३९० | २,७५० |
| चिंच/लोकल: २०.०० क्विंटल | १,१०० | ३,५५० | २,३२५ |
| सोयाबीन: ३१.०० क्विंटल | ४,२०० | ४,२०० | ४,२०० |
| हरभरा: ८.०० क्विंटल | ६,५८० | ६,५८० | ६,५८० |

# कोलकाता बलात्कार–हत्या प्रकरणाची सर्वोच्च न्यायालयाने स्वत:हून घेतली दखल, मंगळवारी होणार सुनावणी

**नवी दिल्ली । वृतसंस्था**

कोलकातामधील आरजी कार मेडिकल कॉलेजमध्ये प्रशिक्षणार्थी डॉक्टर बलात्कार–हत्या प्रकरणाची सर्वोच्च न्यायालयाने स्वत:हून दखल घेतली आहे. आता या प्रकरणी मंगळवारी सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड, न्यायमूर्ती जेबी पार्डीवाला आणि मनोज मिश्रा यांच्या खंडपीठासमोर सुनावणी होणार आहे.

कोलकातामधील सरकारी आरजी कार मेडिकल कॉलेजच्या सेमिनार विभागात शुक्रवार,९ ऑगस्ट रोजी पदव्युत्तर प्रशिक्षणार्थी ३१ वर्षीय महिला डॉक्टरचा रक्तबंबाळ अवस्थेतील अर्धनग्न मृतदेह आढळून आल्यानंतर एकच खळबळ उडाली. या घटनेच्या निषेधार्थात देशभरात निदर्शने झाली, देशभरातील डॉक्टरांनी या

◀◀ पान २ वर

# घरगुती वीजग्राहकांना शून्य वीजबील

## शेतकऱ्यांना मोफत; मुख्यमंत्री शिंदेंनी सांगितले सरकारचे वीज धोरण

सातारा। प्रतिनिधी

राज्य शासनाने गेल्या अडीच वर्षांत सर्वसामान्य माणूस केंद्रबिंदू माणून वीजक्षेत्रात मोठी कामगिरी केली आहे. राज्यातील ४४ लाख शेतकऱ्यांना एप्रिलपासून पुढील पाच वर्ष मोफत वीज देण्यात येत आहे. तर मुख्यमंत्री सौर कृषिवाहिनी योजना व मागेल त्यांना सौर कृषिपंप योजनेतून दिवसा वीजपुरवठा करण्यात येणार आहे. सोबतच केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेतून घरगुती वीज ग्राहकांचे वीजबील देखील शून्यवत होत आहे. या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करून शेतकरी व घरगुती वीज ग्राहकांना मोठा आर्थिक दिलासा देण्यासाठी राज्य शासन कटिबद्ध असल्याची ग्वाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी रविवारी दिली.

◀◀ पान २ वर

# मुख्यमंत्र्यांना राख्या बांधण्यासाठी महिला भगिनी मुंबईला रवाना

## बीड जिल्ह्यातील दोन लाख बहिणींचे अनोखी रक्षाबंधन

**बीड । प्रतिनिधी**

तळागळातील माणसांची जाण असणारे महाराष्ट्र राज्याचे कर्तव्यदक्ष मुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब यांनी महिलांसाठी कल्याणकारी योजनांसह लाडकी बहीण योजना लागू केली आहे. या योजनेचा लाभ माता भगिनींना झाला असून यापुढेही या योजनेचा लाभ महिलांना दरमहा मिळणार आहे. या निर्णयाचा फायदा अडीच कोटीहून अधिक महिलांना होणार आहे. यासोबतच मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजनेच्या माध्यमातून महिलांना वर्षातून तीन सिलिंडर मोफत देण्याचा निर्णय घेतला आहे. बचतगटांतील महिलांचे खेळते भांडवल १५ हजारांवरून वाढवून ३० हजार करण्यात आले आहे. मुलींना उच्च शिक्षणापर्यंतचे शिक्षण मोफत देण्याचा निर्णय घेतला आहे. १० हजार महिलाना पिंक रिक्षांचे वाटप करण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच महिलांना मोफत प्रवास, ५० टक्क्यांपर्यंत मोफत एसटी प्रवास यापूर्वीच दिलेला आहे. मुख्यमंत्र्यांच्या या निर्णयामुळे राज्यातील महिलांना मोठा दिलासा मिळाला आहे. एकनाथ शिंदे यांनी महिलांबाबत घेतलेल्या निर्णयामुळे राज्यातील महिलांमध्ये आशा निर्माण झाली आहे. शासनाने महिलांसाठी कल्याणकारी योजना सुरू करून त्यांना विकासाच्या प्रवाहात आणले आहे. यामुळे राज्यातील 'उमेद'च्या महिला कर्मचारी मुख्यमंत्र्यांना एक कोटी राख्या पाठविणार आहे. याबरोबरचबीड



जिल्ह्यातून २ लाख राख्या घेऊन वीस महिला भगिनी लाडक्या भाऊराया मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेब यांना राखीपौर्णिमा

◀◀ पान २ वर

cmyk

अग्रलेख

# जागा वाटपाचे गणित

महाआघाडीत कुणीही लहान भाऊ, मोठा भाऊ नाही. काँग्रेस, शिवसेना आणि राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गट एकत्रितपणे महायुतीला विशेष करुन भाजपा व शिवसेना शिंदे गटाला सत्तेवरुन दूर करणेसाठी मुठ आवळून मैदानात उतरण्याच्या तयारीत आहेत असे सांगितले जात आहे. पण तसे दिसत नाही. दुसरीकडे महायुतीत विद्यमान सभागृहात भाजपाचे १०५, शिवसेना शिंदे गटाचे ४७ आणि राष्ट्रवादी अजित पवार गटाचे ४१ आमदार आहेत. या जागा त्या-त्या पक्षाला सोडायच्या म्हटल्या तर १९३ जागा अधिक काही अपक्ष अशा २०० जागांचे वाटप झालेच असे मानायला हरकत नाही. उरलेल्या ८८ जागांसाठी ओढाओढी होणार आणि अजितदादा आणि एकनाथ शिंदे यांची शिवसेना जादा जागा मागणार हे अपेक्षित आहे. भाजपच्या गोटात सदाभाऊ खोत यांची शेतकरी संघटना, विनय कोरेंचा जनसुराज्य पक्ष व अन्य आहेत. त्यामुळे ही महायुती जागा वाटप कसे करते यावर महायुतीचे आणि निवडणूक निकालाचे भवितव्य ठरेल पण महायुतीतील कोणत्याही पक्षाला १४५ हा जादुई आकडा गाठता येणार नाही. जी गोष्ट महायुतीची तीच गोष्ट महाआघाडीची होईल असे दिसते आहे. महाआघाडीत जागा वाटपात १७० हून अधिक जागा महाआघाडीचा मोठा भाऊ आणि मुख्यमंत्री पदासाठी उद्धव ठाकरे गटाचे प्रयत्न आहेत. शरद पवार यांनीही विधानसभेला आपणास चांगले यश मिळेल असा अंदाज केला आहे. सुमारे चाळीस युवकांना राष्ट्रवादी मैदानात उतरवणार असे दिसते आहे. काँग्रेसही तिकीट वाटपात शंभर जागा मागते आहे. राज्यातील प्रमुख सहा पक्ष आणि त्यांची जागा मागणीची ईर्षा पाहता युती आणि आघाडी कसा आकार घेते आणि कोणाला कसे यश मिळते हे बघावे लागेल.

प्रमुख सहा राजकीय पक्षांच्या त्यासाठी उठाबशा सुरु आहेत. शरद पवारांनी पाठोपाठ दोनवेळा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची घेतलेली भेट आणि या भेटी संदर्भात किंवा भेटीनंतरचा तपशिल उद्धव ठाकरे यांना न कळल्याने पवारसाहेब आमच्या कट्टर विरोधकाला का भेटत आहेत असा प्रश्न ठाकरे सेनेला पडला आहे. त्याच जोडीला उद्धव ठाकरे व संजय राऊत यांनी केलेला दिल्ली दौरा, काँग्रेसशी जमवून घेण्याची भूमिका आणि उद्धव ठाकरेंना पुन्हा मुख्यमंत्रीपद मिळावे यासाठी सुरु केलेले लॉबिंग यामुळे शरद पवार गटातही अस्वस्थता आहे. शरद पवार, अजितदादा पवार, देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे हे कसलेले राजकारणी आहेत. वेळप्रसंगी हातात-हात घेत एकमेकांचे पाय ओढण्यात तरबेज आहेत. त्यामुळे कोणकोणाचा करेक्ट कार्यक्रम करणार, कुणाला कात्रजचा घाट दाखवणार याबद्दल सर्वच छावण्यात सतर्कता आहे. भाजपाची सूत्रे अमित शहा आणि विनोद तावडे हालवत आहेत हे स्पष्ट झाले आहे. लोकसभेच्या वेळी झालेली गोची आणि तिकीट वाटप जाहीर करण्यास झालेला उशीर टाळण्यासाठी अमित शहा सोबत मुख्यमंत्री व दोन्ही उपमुख्यमंत्री यांच्या तीन-चार बैठका झाल्या आहेत. महाआघाडीतही मतदारसंघ निहाय आढावे घेतले जात आहेत. एकीकडे आघाड्या आणि युती यांची सूत्रे हालत असताना मनसे, जरांगे-पाटील आणि प्रकाश आंबेडकर यांनी आम्ही आमच्या पक्ष व संघटनेच्यावतीने २८८ जागा लढवू अशी घोषणा करुन दौरे, यात्रा, मेळावे सुरु केले आहेत. राज्यातील मराठा समाज, ओबीसी समाज आणि मुस्लीम मतदार मोठ्या संख्येने असल्याने त्यांचे नेते मनोज जरांगे-पाटील, राज ठाकरे आणि प्रकाश आंबेडकर काय भूमिका घेतात हाही महत्वाचा विषय आहे. २८८ जागा लढवते म्हणणे वेगळे व लढवणे वेगळे व जिंकणे तर फारच कठीण पण राज ठाकरे आणि प्रकाश आंबेडकर यांच्या पक्षाच्या अस्तित्वाची ही लढाई असल्याने ते दोघे मैदानात उतरतील तर जरांगे-पाटील मराठ्यांना ओबीसीतून आरक्षण देत नाही तर ते हिसकावून घेऊ या भूमिकेतून निवडणूक मैदानात उतरतील. लोकसभा निवडणुकीत त्यांनी भाजपा व महायुतीला दणका दिला होता. ओघानेच त्यांचे कर्ते करवते म्हणून शरद पवार यांच्याकडे बोट दाखवले जाते. आता २८८ जागा उभा करताना जरांगे-पाटील काय भूमिका घेतात त्यानंतरच चित्र स्पष्ट होईल, पण राज्यात मोठ्या संख्येने असलेले ओबीसी मतदारही सजग झाले आहेत. ओबीसी उमेदवारालाच मतदान अशी त्यांची भूमिका आहे. ओबीसीच्या ताटात ते कुणालाही घ्यायला तयार नाहीत. एकूणच मोठा तिढा आणि जातीय ध्रुवीकरण होताना दिसत आहे. त्याचा कुणाला कसा फायदा होणार आणि कोण जादुई आकडा गाठणार हे कुणीही सांगू शकत नाही. गेल्यावेळी जनतेने महायुतीला स्पष्ट बहुमत दिले पण उद्धव ठाकरे यांनी मोदींचे बोट सोडून शरद पवारांचे बोट पकडले. यावेळीही निकालानंतर कोण कोठे जाईल हे सांगता येत नाही. राजकारणाचा चिखल झाला आहे. सर्वच बरबटलेले आहेत. काहीही करुन सत्ता आणि सत्तेतून सर्व हे धोरण झाले आहे. त्यामुळे विधानसभा निवडणुकीनंतर राज्यात स्थिर लोकमताचे आणि राज्याला पुढे नेणारे सरकार येईल, अशी शक्यता दिसत नाही. मैदानातील सारे मल्ल चिखलात, जातीत आणि स्वार्थात बरबटलेले आहेत. महाराष्ट्राची, देशाची चिंता आहे. अशा मतदारांनी या सर्व चिखलातून बाहेर येऊन महाराष्ट्राचा, महाराष्ट्र धर्माचा आणि पुढील पिढ्यांचा विचार करावा इतकेच आवाहन आहे. निवडणूक आयोगाने हरयाणा आणि जम्मू काश्मीर राज्याच्या निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर केला आहे. महाराष्ट्राची घोषणा केलेली नाही. तूर्त जागा वाटप, मोठा भाऊ आणि मुख्यमंत्रीपदाचा दावेदार या भोवतीच सर्वजण फीरत आहेत.

## राळेसांगवी येथे अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन

**बीड । प्रतिनिधी**

**तालुक्यातील राळेसांवी येथे अखंड हारीनाम सप्ताह व सामुदायिक ज्ञानेश्वरी पारायण सोहळा मंगळवार ( ता.२०) रोजी मच्छिंद्रगडाचे महंत मठाधीपती स्वामी जनार्दन महाराज यांच्या शुभ हस्ते व ब्रम्हवृंदाच्या मंत्र घोषात भाविक भक्तगणा च्या उपस्थित पुषवृष्टी ने होणार आहे. तर मंगळवार २७ ऑगस्ट रोजी महंत विठ्ठल महाराज शास्त्री गहिनीनाथ गडकर यांच्या काल्याच्या किर्तनाने सांगता होणार आहे.**

संत वामनभाऊ महाराज ,संत भगवान बाबा, स्वामी निगमानंद महाराज ,यांच्या आशीर्वादाने महंत विठ्ठल महाराज गहिनीनाथ गडकर यांच्या मार्गदर्शनाने व महंत स्वामी जनार्दन महाराज यांच्या शुभहस्ते व आशीर्वादाने राळेसांगवी येथे अखंड हरिनाम सप्ताह सामुदायिक सामुदायिक ज्ञानेश्वरी पारायण सोहळा संपन्न होत आहे या कार्यक्रमात काकडा भजन विष्णुसहस्रनाम ज्ञानेश्वरी पारायण गाथा भजन भावार्थरामायण प्रवचन कीर्तनाचा कार्यक्रम होणार आहेत प्रवचनकार महंत जनार्दन महाराज, अशोक महाराज खेडकर सर ,श्याम महाराज राख, दत्तात्रय महाराज खेडकर, इंद्रभान महाराज खेडकर, लक्ष्मण महाराज खेडकर, प्राचार्य विश्वनाथ खेडकर सर यांचे प्रवचन होणार आहे तर कीर्तनकार लक्ष्मण महाराज फड ,साक्षीताई गंगावणे ,राम महाराज शास्त्री, नवनाथ महाराज शास्त्री ,रामेश्वर महाराज शास्त्री, गणेश महाराज शास्त्री ,केशव महाराज शास्त्री यांचे दैनंदिनी सप्ताहात कीर्तन होणार आहे .तर मंगळवार २७ ऑगस्ट रोजी महंत विठ्ठल महाराज गहिनीनाथ गडकर यांचे अमृतुल्य कालचे कीर्तन होणार आहे या सप्ताहात गायक वादक हार्मोनियम यांची साथ लाभणार आहे तरी हे सप्ताहाचा लाभ भाविक भक्ताने घ्यावा अशी आव्हान राळेसांगवी ग्रामस्थांनी केले आहे.

## सोयाबिन,कापसाचे भेदभाव न करता सरसकट अनुदान द्या-भाई थावरे

**माजलगाव । प्रतिनिधी**

२०२३ मध्ये शेतकऱ्यांच्या पिकांचे झालेल्या नुकसानीचे केवळ ई पीक पाहणी केलेल्या शेतकऱ्यांना हेक्टरी पाच हजार रुपये नुकसान भरपाई देण्यात आली असून असा भेदभाव न करता सरसकट पाच हजार रुपये प्रमाणे शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यात यावी नसता येत्या २२ ऑगस्ट २०२४ रोजी जिल्हाधिकारी यांची गाडी आडवणार असा इशारा भाई गंगाभीषण थावरे यांनी एका प्रसिद्धी पत्रकार दिला आहे. या पत्रकात पुढे म्हटले आहे की शेतकऱ्यांच्या शेतमालाला कीफायत शिर हमी भावाची मागणी गेल्या अनेक दिवसांपासून प्रलंबित असताना त्यावर शासनाने अद्यापही विचार केलेला नसून हमी भावाच्या नावाखाली शेतकऱ्याची फसवणूक करून तुटपूंजा भाव शेतमालाला दिला जात आहे याबाबत शेतकऱ्यांनी सरकारच्या विरोधात आक्रमक होऊ नये यासाठी



शासन शेतकऱ्यांच्या तुटपुंजी मदत करून शेतकऱ्यांच्या तोंडाला पानें पुसण्याचे काम नेहमीच करत असते, असाच प्रकार शासनाने गतवर्षीच्या सोयाबीन, कापूस उत्पादक शेतकऱ्यांना हेक्टरी पाच हजार रुपये अनुदान देण्याची घोषणा केली असून यासाठी ई पीक पाहणी ची यादी ग्राह्य धरण्यात येत आहे काही शेतकऱ्यांनी ई पीक पाहणी करूनही त्यांचे नावे सदरील यादीत आलेली नसल्याचे आरोप होत आहेत लाखो शेतकरी निरक्षर असल्याने त्यांना ई पीक पाहणी करणे शक्य नाही ही बाब शासनाने विचारात घेऊन तात्काळ सरसकट शेतकऱ्यांना हेक्टरी पाच हजार रुपये अनुदान देण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी अशी मागणी या पत्रकात करण्यात आली असून सरसकट शेतकऱ्यांना अनुदान न दिल्यास जिल्हाधिकारी यांची गाडी अडवून तीव्र आंदोलन करण्याचा इशारा शेतकरी संघर्ष समितीचे नेते भाई गंगा भीषण थावरे यांनी या पत्रकार दिला आहे .



## राज्यस्तरीय आदर्श सरपंच पुरस्काराने मोहन आमटे सन्मानित

**म्हसोबावाडी । प्रतिनिधी**

**आष्टी तालुक्यातील पिंपरी घाटा ग्रामपंचायतचे सरपंच मोहन कुंडलिक आमटे यांनी ग्रामपंचायत क्षेत्रातील कामकाजात केलेल्या उल्लेखनीय कामगिरीची दखल घेऊन स्वराज्य सरपंच सेवा संघाच्या वतीने देण्यात येणार्या राज्यस्तरीय आदर्श सरपंच पुरस्काराने मोहन कुंडलिक आमटे यांना आज रविवार दि.१८-८-२०२४ रोजी अहमदनगर येथील माऊली संकुल सभागृह सावेडी येथे स्वराज्य सरपंच सेवा संघाचे संस्थापक बाबासाहेब पावसे यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.**

माजी राज्यमंत्री सुरेश (आण्णा)धस यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामीण भागाच्या विकासाचा ध्यास घेऊन पिंपरी घाटाचे सरपंच मोहन आमटे यांनी गावचा विकास करण्यासाठी प्रशासन तसेच ग्रामस्थांच्या मदतीने पिंपरी घाटा गावात ग्रामपंचायतच्या माध्यमातून विविध योजनांच्या सहाय्याने सर्वसामान्य जनतेसाठी विविध विकास कामे करून तालुक्यातच नव्हे तर जिल्ह्यात नावलौकिक मिळविला आहे सरपंच मोहन आमटे यांच्या कार्याची दखल घेऊन स्वराज्य सरपंच सेवा संघाच्या वतीने पिंपरी घाटा चे सरपंच मोहन कुंडलिक आमटे यांना राज्यस्तरीय आदर्श सरपंच पुरस्कार ने सन्मानित करण्यात आले शासनाच्या माध्यमातून ग्रामपंचायतीकडे येणाऱ्या अनेक सोयी सुविधांचा विकास कामांचा लाभ जास्तीत जास्त लाभार्थ्यांना मिळावा यासाठी ते कायम अग्रेसर असतात अशा अनेक बाबींमुळे पिंपरी घाटाचे सरपंच मोहन आमटे यांची राज्यस्तरीय आदर्श सरपंच म्हणुन सन्मानीत करण्यात आले त्यांना धार्मिक,राजकीय, शैक्षणिक, सामाजिक क्षेत्रातिल अनेक मान्यवरांनी शुभेच्छा दिल्या.

## भोगलवाडीत संत भगवान बाबांच्या मंदिरासमोर सभागृह उभारण्यास निधी देणार-धनंजय मुंडे



**धारूर । प्रतिनिधी**

**भोगलवाडी येथील ग्रामस्थांच्या वतीने गावात अनेक वर्षानंतर भगवान बाबा यांचे मंदिर उभारण्याचा एकमताने निर्णय झाला; या मंदिरासाठी संत भगवान बाबांची मूर्ती स्वत: भगवानगड देणार असून या मंदिरासमोर उभारण्यासाठी आवश्यक निधी राज्याचे कृषिमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी भोगलवाडी येथे बोलताना दिला आहे.**

भगवानगडाचे महंत न्यायाचार्य ह. भ. प. डॉ. नामदेव महाराज शास्त्री यांच्या सुश्राव्य अशा काल्याच्या कीर्तनाने आज भोगलवाडी ता. धारूर येथील अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता झाली. यावेळी कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी उपस्थित राहून डॉक्टर नामदेव शास्त्री यांचे दर्शन व आशीर्वाद घेतले. भोगलवाडी गावाशी व या परिसराशी माझे अनेक वर्षापासूनचे नाते असून बऱ्याच दिवसानंतर इथे आलो आहे. या भागाने स्वर्गीय मुंडे साहेबांपासून आमच्या समस्त मुंडे कुटुंबावर प्रचंड प्रेम केलेले आहे. या प्रेमातून मी असो किंवा पंकजाताई असो, कधीही उतराई होऊ शकणार नाहीत. आमच्याकडे कोणतेही पद असो सत्ता असो किंवा नसो मात्र येथील लोकांच्या सेवेसाठी आम्ही कायम तत्पर राहू असेही याप्रसंगी धनंजय मुंडे म्हणाले. याप्रसंगी राजकीय - सामाजिक क्षेत्रातील मान्यवर तसेच भोगलवाडी आणि परिसरातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पान १वरून...

पान १वरून...

### राज्यस्तरीय कृषी महोत्सवाची

तत्पूर्वी आज सकाळी कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी परळी येथील शासकीय विश्रामगृहात अधिकाऱ्यांच्या समवेत कृषी महोत्सवाच्या तयारीचा आढावा घेतला यावेळी जिल्हाधिकारी अविनाश पाठक पोलीस अधीक्षक अविनाश बारगळ जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी संगीता देवी पाटील, कृषी विभागाचे सह संचालक श्री दिवेकर, श्री मोटे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुभाष साळवे यांसह ज्येष्ठ नेते वाल्मिक अण्णा कराड, तहसीलदार व्यंकटेश मुंडे यांसह कृषी, महसूल पोलीस अधिकारी आदी उपस्थित होते. धनंजय मुंडे यांनी या अधिकाऱ्यांसमवेत कृषी महोत्सवासाठी निवडण्यात आलेल्या परळी शहरातील बाजार समितीच्या मैदानावर सुरू असलेल्या संपूर्ण तयारीची पाहणी केली. यावेळी मुख्य कार्यक्रमासाठी उभारण्यात येत असलेला मंडप, आसन व्यवस्था, त्याचबरोबर शेतकऱ्यांसाठी उभारण्यात येत असलेले शेकडो स्टॉल्स, पार्किंग व्यवस्था, भोजन व्यवस्था, सुरक्षा आदी सर्व बाबींची पाहणी करून सर्व व्यवस्थापन चोखपणे करण्याचे निर्देश धनंजय मुंडे यांनी संबंधितांना दिले आहेत.

-------------

### आरक्षण संपवणे

मुलभूत गोष्टीला धक्का देण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. फक्त काही कार्पोरेट्स कंपन्यांच्या प्रमुख पदावरून बसवून ते काय दिवे लावतात याचे ज्वलंत उदाहरण म्हणजे सेबीच्या प्रमुख पदावर करण्यात आलेली व्यक्तीची नियुक्ती सर्वकाही सांगून जात असल्याची टीकाही त्यांनी केली.

**इंडिया आघाडी ताकदीने विरोध करणार**

राहुल गांधी पुढे बोलताना म्हणाले की, प्रशासनिक नियुक्ती पध्दती आणि सामाजिक न्यायाच्या धोरणाला धक्का देणाऱ्यांचा इंडिया आघाडीकडून जोराचा आणि पूर्ण ताकदीने विरोध करण्यात येणार आहे. मात्र आयएएसचे खासगीकरण, आरक्षण संपविणे हीच खरी मोदीची गॅरंटी असल्याचा आरोपही यावेळी त्यांनी केला.

**केंद्रीय लोकसेवा आयोगाने मागविले ४५ जागांसाठी अर्ज**

केंद्रीय लोकसेवा आयोगाने विविध मंत्रालये आणि विभागांमध्ये संचालक, संयुक्त सचिव आणि उपसचिव या ४५ मध्यम श्रेणी पदांसाठी अर्ज मागवले आहेत. आत्तापर्यंत, गेल्या ५ वर्षांत या स्तरांवर ६३ नियुक्त्या करण्यात आल्या आहेत. सध्या अशा ५७ अधिकाऱ्यांचे पोस्टिंग करण्यात आले आहे. अशी माहिती केंद्र सरकारने नुकतीच राज्यसभेत दिली आहे. आता पुन्हा ४५ जागांसाठी अर्ज मागवले आहेत. वित्त मंत्रालयात दोन संयुक्त सचिवांना फिनटेक, सायबर सुरक्षा आणि गुंतवणुकीच्या जबाबदारीसाठी नियुक्त केले जाणार आहे. या पदांच्या भरतीसाठी जारी केलेल्या अधिसूचनेनुसार, इच्छुक उमेदवारांना १७ सप्टेंबरपर्यंत अर्ज सादर करावे लागतील.

**संयुक्त सचिव पदांच्या १० जागांसाठी अर्ज**

संयुक्त सचिव पदांच्या १० जागांसाठी अर्ज मागविण्यात आले आहेत. यात वित्त आणि इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयांतील प्रत्येकी दोन तसेच पर्यावरण, स्टील, शिपिंग, विज्ञान आणि तंत्रज्ञान, अपारंपरिक ऊर्जा आणि गृह मंत्रालयातील प्रत्येकी एका पदाचा समावेश आहे. विशेषतज्ज्ञ लोकांची गरज लक्षात घेऊन, इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयांने उदयोन्मुख तंत्रज्ञान आणि सेमिकंडक्टर आणि इलेक्ट्रॉनिक्ससाठी संयुक्त सचिव पदासाठी अर्ज मागवले आहेत.

**अशी आहे पात्रता...**

संयुक्त सचिव पदासाठी किमान १५ वर्षाचा अनुभव आवश्यक आहे. तर उमेदवाराचे वय ४०-४५ दरम्यान असावे. यासाठी पगार दरमहा सुमारे २.७ लाख रुपये असेल. त्याचप्रमाणे संचालक आणि उपसचिव उमेदवारांना अनुक्रमे किमान १० आणि ७ वर्षांचा अनुभव आवश्यक आहे. उमेदवार हा संचालकपदासाठी ३५-४५ वर्षे आणि उपसचिवांसाठी ३२-४० वर्षे वयोगटातील असावा, असे नमूद करण्यात आले आहे.

**धर्म नाही, आरक्षण धोक्यात - प्रकाश आंबेडकर**

पुन्हा सांगतोय धर्म संकटात नाही, आरक्षण संकटात आहे. एससी, एसटी आणि ओबीसींना त्यांच्या घटनात्मक अधिकारांपासून वंचित ठेवण्याचे हे भाजपाचे मॉडेल आहे, अशी टीका वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी ट्विटरच्या माध्यमातून केली. भाजपा-आरएसएस बाबासाहेबांचे कार्य टप्प्या-टप्प्याने पुसून टाकत आहेत. केंद्र सरकारमधील ४५ पदे मागच्या दाराने भरण्याऐवजी युपीएससी मार्फत परीक्षेद्वारे भरली असती, तर ६ पदे एससी, ३ एसटी आणि १२ ओबीसी प्रवर्गासाठी राखीव राहिली असती. आरक्षण धोक्यात आहे. हे आधीपासून कार्यरत असलेल्या एससी, एसटी आणि ओबीसी कर्मचाऱ्यांना पदोन्नतीपासून वंचित ठेवले जाईल कारण, उच्च पदे आता मागच्या दाराने (लॅटरल एंन्ट्री) भरली जातील असा आरोपही त्यांनी यावेळी केला.

----------

### लाडक्या बहिणींनी डॉ.योगेश

लाडकी बहिण योजना राबविण्यात आशा सेविकांचे योगदान असून योजनेचा प्रचार, प्रसार करण्याचे काम त्यांनी केले. प्रास्ताविक भाषणात डॉ.सारिकाताई क्षीरसागर म्हणाल्या, आता प्रत्येक महिला समाजाची लाडकी बहिण होत आहे. रक्षाबंधनानिमित्त त्यांना भेटण्याचा योग आला. त्यांना डॉ.योगेश क्षीरसागर यांनी दिलेली साडी-चोळीची भेट पुरेशी नसून आशा सेविका, मदतनीस यांचे प्रलंबित प्रश्न सोडवून त्यांना भेट द्यावी. शासनाची अनेक प्रकारची सर्वेक्षणे, कामे आशा सेविका करतात. त्यांचे योगदान समाज विसरू शकत नाही. त्यांचा बहुमान करण्यासाठी त्यांचे वेतन, कायमस्वरूपी नोकरीचे प्रश्न मार्गी लावून शासन, प्रशासनाने सहकार्य करावे. महिला बालविकास मंत्री आदितीताई तटकरे ह्या पगाराचा प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्नशील आहेत, असेही त्या म्हणाल्या. यावेळी दुबे ताई, संगीता जाधव, शोभा सरवदे, थोरात ताई, छाया जाधव, कल्पना बांगर, शालिनी परदेशी, संगीता वाघमारे यांच्यासह मोठ्या संख्येने महिलांची उपस्थिती होती.

**महिला व बालविकास मंत्री ना.आदितीताई तटकरे यांनी दिल्या भ्रमणध्वनीवरून शुभेच्छा**

आशा सेविका, मदतनीस महिलांनी लाडकी बहीण योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन महिला व बालविकास मंत्री ना.आदितीताई तटकरे यांनी केले. त्यांनी डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या भ्रमणध्वनीवरून संवाद साधत उपस्थित महिलांशी संवाद साधला. तसेच, आशा सेविका, मदतनीस यांचे प्रलंबित प्रश्न सोडविण्यासाठी महायुती सरकार कटिबध्द असल्याची ग्वाही त्यांनी दिली.

------------

### मराठा आरक्षणावरून

ते म्हणाले, मराठा आरक्षण कळीचा मुद्दा आहे. पण वाघ आणि सिंहाने मागावे का? मराठ्यांनी उभा देश चालवायचे आहे. आरक्षण कुठे घेऊन बसलाय? असे विधान संभाजी भिडेंनी केले. मागील काही काळापासून विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मराठा आरक्षणाचा मुद्दा पुन्हा चर्चेत आला असून मराठा आंदोलक महत्त्वाच्या नेत्यांच्या भेटी घेताना दिसत आहेत.

**लाडकी बहीण योजनेचे कौतुक, पण...**

शिवप्रतिष्ठानचे प्रमुख संभाजी भिडे यांनी देखील मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेवर भाष्य करत सरकारचे कौतुक केले आहे. मात्र, राज्यातील महिलांवर होत असलेल्या अत्याचारावरुन सरकारचे कानही टोचले आहेत.

-------------

### कोलकाता बलात्कार-हत्या प्रकरणाची

प्रकरणी कठोर कारवाईबरोबरच डॉक्टरांच्या सुरक्षेसाठी ठोस उपाययोजनांची मागणी केली. डॉक्टर आक्रमक झाल्यानंतर कॉलेजचे प्राचार्य संदीप घोष यांनी प्राचार्यपदाचा राजीनामा दिला. कोलकाता उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर या प्रकरणाचा तपास सीबीआयने हाती घेतला आहे. या प्रकरणातील आरोपी हॉस्टिटल मधील नागरी स्वयंसेवक संजय रॉय याला ताब्यात घेतले आहे.

**पीडितेच्या आई-वडीलांचे गंभीर आरोप**

या प्रकरणातील पीडितेच्या वडीलांनी एएनआयला मुलाखत दिली आहे. यावेळी त्यांनी आम्हाला कोणीही सहकार्य करत नसल्याचे म्हटले आहे. यात संपूर्ण विभागाचा सहभाग आहे, असा आरोप वडीलांनी केला. स्मशानभूमीत तीन मृतदेह होते पण आमच्या मुलीच्या पार्थिवावर आधी अंत्यसंस्कार करण्यात आले, असेही त्यांनी एएनआयशी बोलताना सांगितले.

पीडितेच्या आईने एएनआयला दिलेल्या प्रतिक्रियेत धक्कादायक खुलासा केला आहे. त्या म्हणाल्या, ''आधी आम्हाला हॉस्पिटलमधून तुमची मुलगी आजारी असल्याचा फोन आला, त्यानंतर कॉल डिस्कनेक्ट झाला. त्यानंतर मी पुन्हा फोन करून काय झाले, असे विचारले. तेव्हा असिस्टंट सुपरव्हायजरने आम्हाला तुमच्या मुलीने जीवन संपवल्याचे सांगितले. आम्ही तिथे पोहोचलो तेव्हा हॉस्पिटल प्रशासनाने आत सोडले नाही. आम्हाला ३ वाजता तिला पाहण्याची परवानगी दिली. यावेळी तिची पँट उघडी होती, अंगावर एकच कपडा होता. तिचा हात मोडला होता, तिच्या डोळ्यातून, तोंडातून रक्त येत होते. नुसतं बघून असं वाटत होतं की कुणीतरी तिचा खून केला आहे. मी त्यांना सांगितले की ही आत्महत्या नाही, खून आहे. एका व्यक्तीला अटक करण्यात आली आहे. मला खात्री आहे की आणखी बरेच लोक यात सामील आहेत. या घटनेला संपूर्ण विभाग जबाबदार आहे असे मला वाटते.

----------

### घरगुती वीजग्राहकांना

पाटण तालुक्यातील (जि. सातारा) मान्याचीवाडी गावामध्ये महावितरणच्या वतीने १०० टक्के सौर ऊर्जीकरण करण्यात आले आहे. राज्यातील पहिले 'सौरग्राम' झालेल्या मान्याचीवाडीचे लोकार्पण करताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे बोलत होते. वीजक्षेत्रात राज्य शासनाने केलेल्या कामगिरीबद्दल उपमुख्यमंत्री व ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांचे तसेच पहिल्या सौरग्रामचे सरपंच रवींद्र माने यांचे त्यांनी जाहीर अभिनंदन केले. या कार्यक्रमाला उपमुख्यमंत्री व ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री शंभूराज देसाई, महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे, महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र, मान्याचीवाडीचे सरपंच रवींद्र माने आणि महावितरणचे संचालक (प्रकल्प) प्रसाद रेशमे यांची प्रमुख उपस्थिती होती. मुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, सातारा जिल्ह्यातील मान्याचीवाडी गावाने राज्यात पहिले सौरग्राम होण्याचा मान मिळवला आहे. या गावातील प्रत्येक नागरिकाचे मी अभिनंदन करतो. सौर ऊर्जा ही प्रामुख्याने घरगुती ग्राहक व शेतकऱ्यांसाठी वरदान ठरत आहे. प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेतून छतावरील सौर ऊर्जा प्रकल्पाद्वारे घरगुती ग्राहकांचे वीजबिल शून्य होत आहे. तसेच राज्य शासनाने मागेल त्यांना सौर कृषिपंप योजना जाहीर केली असून खुल्या प्रवर्गातील शेतकऱ्यांना १० टक्के रक्कम तर अनुसूचित जाती, जमातीच्या शेतकऱ्यांना पाच टक्के रक्कम भरून साडेसात अश्वशक्तीपर्यंत कृषिपंप व सौर पॅनेल्स मिळणार आहे. उर्वरित रक्कम राज्य शासन अनुदानातून देणार असल्याची माहिती मुख्यमंत्री शिंदे यांनी दिली. उपमुख्यमंत्री व ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, प्रधानमंत्री सूर्यघर योजनेतून घरगुती ग्राहकांना मोफत वीज उपलब्ध होत आहे. तर येत्या दीड वर्षांमध्ये राज्यात सौर ऊर्जेद्वारे १२ हजार मेगावॅट विजेची निर्मिती होणार आहे. ही वीज शेतकऱ्यांना दिवसा देण्यात येणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना सिंचनासाठी रात्री शेतात जाण्याची गरज राहणार नाही. राज्याने सौर ऊर्जेमध्ये मोठी आघाडी घेतली आहे. राज्यात पहिले सौर ग्राम म्हणून मान्याचीवाडीचे आज लोकार्पण झाले याचा आनंद आहे. या गावात पूर्वी ५ लाख २५ हजार रुपयांचे वीजबिल येत होते. ते सौर ग्राममुळे शून्य झाले आहे. आता राज्यातील १०० गावे १०० टक्के सौर ऊर्जेवर नेण्याची मोहीम सुरु असून त्यासाठी गावांची निवड झाल्याचेही फडणवीस यांनी सांगितले.

----------

### मुख्यमंत्र्यांना राख्या बांधण्यासाठी

दिनी राख्या बांधण्यासाठी काल रात्री सायं ७.०० वाजताच्या दरम्यान बीड शहरातील जालना रोड येथील शिवसेना मध्यवर्ती कार्यालय येथून रवाना झाल्या आहेत. याप्रसंगी शिवसेना जिल्हाप्रमुख मा. अनिलदादा जगताप, सचिन भैय्या मुळूक शिवसेना पदाधिकारी लोकप्रतिनिधी आणि महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी सर्वांत अधिक योजना आणत आहेत. हे सर्व महिलांना दिसत आहे. मुख्यमंत्री हे आपले मोठे भाऊ आहेत, अशी भावना राज्यातील महिलांमध्ये निर्माण होत आहे. दरम्यान, राज्यातील बचत गटाच्या महिलांमार्फत राखी तयार करण्याचे काम सुरू झाले आहे. राज्यातील ४० हजार गावांतून मुख्यमंत्री व ग्रामविकास मंत्र्यांना राखी पाठविण्यात येणार आहे. शासनाने आणलेल्या नवीन योजनांमुळे सर्वत्र आनंदाचे व उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. १९ ऑगस्ट राखी पौर्णिमेला मोठ्या भावाला राखी बांधण्यासाठी' चलो मुंबई' असा नारा गावागावात महिला देत आहेत. याप्रमाणेच बीड जिल्ह्यातून २ लाख राख्या घेऊन वीस महिला भगिनी लाडक्या भाऊराया मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेब यांना राखीपौर्णिमा दिनी राख्या बांधण्यासाठी वर्षा निवास्थान मुंबई येथे रवाना झाल्या असल्याची माहिती शिवसेना जिल्हाप्रमुख मा. अनिलदादा जगताप आणि सचिन मुळूक यांनी दिली आहे.

-------------

### शिवसंग्राम पक्षाच्या

यावेळी राज्यातील सर्व सभासद उपस्थितीत होते. आगामी काळातील राजकीय भूमिका काय असणार यावर चर्चा झाली. शिवाजी महाराज स्मारक आणि मराठा आरक्षण यावर चर्चा झाली, याबाबत त्या मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेणार आहोत, असे सांगण्यात आले. ज्योती मेटे स्वतः निवडणूक रिंगणात उतरणार असल्याची शक्यता आहे. बीडमधून त्यांनी चाचपणी सुरू केली आहे. आम्ही निवडणुका ज्या ठिकाणी जिंकेल असे वाटते त्याच ठिकाणी लढणार असल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली. मनोज जरांगे पाटील याची राजकीय भूमिका ठरली नाही त्यामुळे त्यांच्याशी बोलणी झाली नाही, आम्ही सगळ्यांशी बोलणार आहोत, असेही त्यांनी यावेळी म्हटले. आरक्षण मुद्द्यावर सरकारने सर्वपक्षीय बैठकीला बोलावले तर जाऊ, पण आम्हाला बोलावलेच पाहिजे अशी आमची भूमिका आहे. कारण मेटे साहेब आरक्षणासाठी अनेक वर्षे लढत होते. त्यामुळे आम्हाला बोलावले पाहिजे, असेही ज्योती मेटे यांनी म्हटले आहे. जाती आणि समाजाचा निर्णय नाही तर मानसिकतेचा मुद्दा आहे, मन दुभंगले नाही पाहिजे याची काळजी सरकारने घेतली पाहिजे. विनायक मेटे यांची पण ओबीसीमधून आरक्षण मिळावी अशी मागणी होती, आजही ओबीसीमधून आरक्षण मागणी आहे. समाजाचे हित लक्षात घेऊन मराठा आरक्षण मागणी जरांगे पाटील करत आहेत, असेही त्यांनी यावेळी म्हटले.

------------

### महाराष्ट्रात गुलाबी

गुलाबी जॅकेट परिधान केले आहे. महाराष्ट्रात सुरु असलेल्या या गुलाबी राजकारणाची चांगलीच चर्चा रंगली आहे. महाराष्ट्राच्या राजकारणातला गुलाबी रंग हा तसा नवा नाही. केसीआर यांच्या बीआरएसने महाराष्ट्रातही गुलाबी रंगाचे वादळ आणले होते. परंतु ते अचानक लुप्त झाले. आता याच गुलाबी रंगाला अजित पवार यांनी आपलसं केले आहे. राष्ट्रवादीचे काम करणाऱ्या एजन्सीने हा रंग सुचवल्याचे बोलले जात आहे. मात्र दादांची ही 'गुलाबी' चाल विरोधी पक्षातल्या नेत्यांसह सर्वपक्षीयांना भुरळ घालून गेली आहे. याची झलक मुंबईतल्या भाजपच्या कार्यकर्मात पहायला मिळाली. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अजित पवार यांच्या प्रमाणे गुलाबी जॅकेट परिधान केले आहे.

------------

दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

सोमवार दि. १९ ऑगस्ट २०२४



## अबॅकस चॅम्पीयनशिपमध्ये पृथ्वीराज मुंडे, प्रियदर्शनी मुंडेचे यश

**बीड । प्रतिनिधी**

येथील पृथ्वीराज महादेव मुंडे व प्रियदर्शनी महादेव मुंडे या बहीण-भावाने अबॅकस चॅम्पीयनशिपमध्ये यश मिळवले आहे. पृथ्वीराज व प्रियदर्शनी यांनी जागतिक स्तरावरील ज्ञान आंतरराष्ट्रीय संघटना तसेच एको. किड्स आणि आयएमएमओ च्या वतीने आयोजीत अबॅकस ओलंपियाड चॅम्पियनशिप मध्ये सहभाग घेतला होता. यामध्ये प्रथम रँकिंग मिळवून ऐतिहासिक यश मिळवलेले आहे. पृथ्वीराज मुंडे आणि प्रियदर्शनी मुंडेने सर्वोत्कृष्ट क्रमांक मिळवल्यामुळे त्याची रशिया, दुबई तसेच बेंगलोर येथे नोव्हेंबर महिन्यात होणाऱ्या ऑनलाइन आणि ऑफलाइन जागतिक अबॅकस ओलंपियाडसाठी सुद्धा निवड करण्यात आलेली आहे. मुंडे बहीण-भावाच्या या यशाबद्दल अभिनंदन केले जात आहे.



# अॅड. राज पाटील करणार शेतकऱ्यांसाठी ठिय्या आंदोलन

## कापूस, सोयाबीनचे सरसकट अनुदान देण्याची मागणी

वडवणी । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना कापूस, सोयाबीन या पिकांचे सरसकट अनुदान देण्यात यावे अन्यथा बीड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आपण सोमवार पासून ठिय्या आंदोलन करणार असल्याचा इशारा लढा दुष्काळाशी फाउंडेशनचे अध्यक्ष तथा सरपंच परिषद महाराष्ट्रचे बीड जिल्हाध्यक्ष अँड. राज पाटील यांनी दिला आहे.

एडवोकेट राज पाटील यांनी बीड जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना शासनाने अनुदान देण्याचे जाहीर केले आहे. सदर अनुदानाच्या याद्याही प्रसिद्ध करण्यात आलेल्या आहेत. मात्र याद्यांमध्ये बहुतांशी शेतकऱ्यांची नावेच नाहीत. ज्या शेतकऱ्यांनी ऑनलाइन पीक पाहणी केली नाही त्याा शेतकऱ्यांचे नाव यादीतून वगळण्यात आले असल्याचे सांगण्यात येत आहे. मात्र शेतकरी पिक पाहणी करू शकतो का ...? तेवढे तंत्रज्ञान विकसित झालं आहे का..? तेवढ्या सुविधा शेतकऱ्यांजवळ आहेत का..? एकीकडे पिठाला आणि मिठाला महाग झालेला शेतकरी या ऑनलाइनची पिक पाहणी करण्यासाठी आवश्यक असणारा १५ २० हजाराचा मोबाईल घेऊ शकतो का..? कोणाकडून जरी घेतला तरी त्यासाठी लागणारे बॅलन्स तो टाकु शकतो का? ते तंत्रज्ञान शिकायचं कुठं..? याचे उत्तर सरकारला द्यावे लागतील. अगोदरच निसर्गाच्या अवकृपेचा फटका शेतकऱ्यांना बसला आहे. वेळेवर पाऊस पडत नाही. पीक पदरात पडेपर्यंत त्याची काही खात्री नाही. काही प्रमाणात आलेलं पीक वन्य प्राण्यांच्या कचाट्यात जाते. रानडुक्कर हरण यासारख्या



प्राण्यांकडून पिकांची नासधूस होते. शेतकऱ्याने भरलेले पिक विमा देखील मिळत नाही. विमा कंपन्या गडर करण्याचं काम सरकार करत आहे. अनेक शेतकऱ्यांनी गेल्या वर्षी पिक विमा भरले मात्र कोणत्याही शेतकऱ्यांना अद्याप पिक विमा आलेला नाही. कागदी घोडे नाचवून पिक विमा कंपन्यांची भरती करणारे हे सरकार मदतीचा तुकडा शेतकऱ्यांना टाकत आहे आणि तो तुकडाही देताना शंभर अटी टाकून शेतकऱ्यांना बेजार करण्याचे काम हे सरकार करत आहे. सरकारनं शेतकऱ्यांना आर्थिक मदत जाहीर केले आहे. मात्र ही मदत देताना त्यांनी पिक पेरा ऑनलाइन ज्यांनी केला नाही त्यांना या मदतीच्या याद्या मध्ये घेतलेले नाही. बहुतांश शेतकरी या जाचक अटीमुळे अनुदानापासून वंचित राहणार आहेत. शेतकऱ्यांना मदत द्यायचीच असेल तर सरसकट द्या आवड निवड करू नका. सर्वच शेतकरी हे आर्थिक विवंचनेत आहेत त्यांना ही मदत मिळाली पाहिजे. शासनाने ह्या जाचक अटी तात्काळ रद्द कराव्यात आणि सर्व शेतकऱ्यांचे नावे यादीत घ्यावेत अन्यथा सोमवारपासून बीडच्या जिल्हाधिकारी कार्यालयाच्या समोर ठिय्या आंदोलन करण्यात येईल असा इशारा एडवोकेट राज पाटील यांनी दिला आहे.

### मदतीला धावून जाणारे अॅड. राज पाटील

एडवोकेट राज पाटील यांनी जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे दुःख ओळखून हा आंदोलनाचा इशारा दिला आहे. मागील २४ वर्षापासून एडवोकेट राज पाटील हे बीड जिल्ह्यात सामाजिक कार्य करत आहेत त्यांनी आतापर्यंत शेतकऱ्यांसाठी अनेक वेळा आंदोलने केले आहेत त्यामध्ये त्यांनी ऊस उत्पादक शेतकरी कापूस सोयाबीन यासारख्या उत्पादन घेणाऱ्या शेतकऱ्यांना न्याय मिळावा यासाठी आंदोलने केले आहे त्याचबरोबर जिल्ह्यातील निराधार वृद्ध आणि सर्वसामान्य लोकांना न्याय मिळवून देण्यासाठी त्यांनी आवाज उठवलेला आहे लढा दुष्काळाशी फाउंडेशनच्या माध्यमातून लाखो झाडांचे लागवड करून त्यांनी ते जोपासले आहेत हा संघर्षाचा इतिहास येऊन राज पाटील पुन्हा एकदा शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी रस्त्यावर उतरणार आहेत.

## तुम्ही बॅनर फाडले तर आझाद क्रांती सेना पुतळे उभे करेल- राजेश घोडे

**माजलगाव । प्रतिनिधी**

तालुक्यातल्या लऊळ क्र १ येथे साहित्यारत डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त लावण्यात आलेले बॅनर काही समाजकंटका कडून फाडण्यात आल्याचा प्रकार दि.१७ ऑगस्ट रोजी सकाळी उघडकीस आला. या बॅनर वरती डॉ.अण्णाभाऊ साठेसह छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिबा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, राजश्री शाहू महाराज, अहिल्यादेवी होळकर, वस्ताद लहुजी साळवे अशा महापुरुषांच्या प्रतिमा असल्याने आंबेडकरी समुदायात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

घटनेची माहिती मिळताच आझाद क्रांती सेनेचे प्रमुख राजेश घोडे यांनी लऊळ क्रमांक १ येथे जाऊन समाजाला शांततेचे आवाहन केले. व डॉ. लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीचे बॅनर फाडण्याची ही दुसरी घटना असून या घटनेचा जाहीर निषेध केला.

मनुवादी विचारांनी भरकटलेल्या या जातीवादी मानसिक वृत्तीला ठेचून काढले जाईल असा इशारा देण्यात आला.या पुढे महापुरुषांचे प्रतिमा असलेले बॅनर फाडले तर आझाद क्रांती सेना पुतळे उभे करेल असा निर्वाणीचा इशारा देऊन सर्व आंबेडकरी समुदायाला शांततेचे आवाहन केले. लवूळ क्र.१ येथील आजाद क्रांती सेनेच्या कार्यकर्त्यांनी सी.सी.टीव्ही हस्तगत करून पोलीस प्रशासनाच्या स्वाधीन केले.जो पर्यंत संबंधित माथे फिरूवर अॅट्रॉसिटी अॅक्ट प्रमाणे गुन्हा नोंद होत नाही तो पर्यंत पोलीस ठाण्यात ठाण मांडले आंबेडकरी समुदायाचा रेटा व पुरावे पाहून पोलीस प्रशासनाने संबंधित माथेफिरुवर अॅट्रॉसिटी अॅक्ट प्रमाणे गुन्हा नोंद केला.यावेळी आंबेडकरी समुदायातील सर्व संघटनाचे कार्यकर्ते मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते.



## कलकत्ता येथील अत्याचार प्रकरणी फाशीची शिक्षा द्या -राजेंद्र आमटे

बीड । प्रतिनिधी

वासनेच्या अधीन झालेल्या नराधमाने एक नव्हे अनेक लेकीच आयुष्य उद्ध्वस्त केले आहे. एखाद्या निष्पाप मुलीचा बलात्कार, खून, हत्त्या झाली की आम्ही मेणबत्त्या पेटवतो, मोर्चे काढतो, बंद हाक देतो पुन्हा दोन चार महिने झाले की शांत होतो आरोपी जमीन करून घेतात पुन्हा रजोस मोकळे फिरतात बलात्कार, खून, यातील आरोपीचे खटले प्रकरण चालवण्यात वेळ न घालवता हाय स्पीड खटले चालवत प्रकरण निकाली काढून तत्काळ आरोपीला फाशीची शिक्षा ध्या. काय होईच ते होऊ ध्या पुन्हा एखाद्या निष्पाप लेकी कडे वाकडी नजर करून पाहण्याची हिम्मत कोणता होणार नाही.



ज्या देशात स्त्री च्या सन्मान साठी रामायणाचे युद्ध महाभारताचे युद्ध झाले त्याच देशात बलात्कार, खून अत्याचार करणाऱ्या नराधमाच्या विरोधात मेणबत्त्या पेटवतो, कोठे बंद करतो या पेक्षा तत्काळ आरोपींना फाशीची शिक्षा द्या तेव्हा या देशातील लेकी सुरक्षित राहतील कोलकत्ता येथे झालेला अत्याचार हा दुर्दैवी प्रकार कायद्याच्या नेबळट पणा मुळे झाला आहे कोलकत्ता येथील आरोपींना फाशीची शिक्षा द्या अशी मागणी शिवसंग्राम शेतकरी आघाडी जिल्हाध्यक्ष राजेंद्र आमटे, अर्जुन सोनवणे, संजय तीपाले, सुधाकर सोनवणे, कृष्णा मसुरे, रमेश जगताप, शैलेश सुरवसे, आदीच्या वतीने आव्हान करण्यात येते आहे.

## चौसाळा येथे पत्रकार संवाद यात्रेचे स्वागत

**चौसाळा । प्रतिनिधी**

दीक्षाभूमी ते मंत्रालय या आयोजित केलेल्या पत्रकार सव्वाद यात्राचे चौसाळा ता बीड येथे आगमन होताच सव्वाद यात्रेतील मान्यवत्राचे स्थानिक पत्रकारच्या वतीने भव्य स्वागत करून मान्यवर पधादिकाऱ्याला सत्कारीत करण्यात आले पत्रकार सव्वाद यात्रा दिनांक १४ रोजी चौसाळा येथे आली असता सव्वाद यात्रे तील महाराष्ट्र राज्य पत्रकार संघटनेचे प्रदेश अध्यक्ष्य वसंत मुंडे प्रदेश सरचटणीस विश्वास आरोटे मराठवाडा विभाग अध्यक्ष्य वैभव स्वामी यांचे स्थानिकचे जेष्ठ पत्रकार एन टी वाघमारे यांनी पुष्पहार घालून त्यांना सत्कारीक करण्यात आले याच कार्यक्रमात एन टी वाघमारे यांनी पत्रकारांना मिळणाऱ्या अधिकृत स्वीकर्ती कार्डमधील घातलेले जाचक व अटी रद्द त्यांना तातडीने कार्ड मिळून द्यावे अशे सुचवले तर सदरील यात्रा चौसाळा येथे येऊन स्थानिक पत्रकाराशी सव्वाद साधला या बद्दल आभार व्यक्त केले या सव्वाद यात्रा कार्यक्रमाला चंद्रसेन गुंजाळ. मधुकर तोडकर. बाबू हावले. पत्रकार बळीराम राऊत. पंडित जोगदंड. विकास नायकवाडे. विकास सर्वज्ञ. सुधीर चौधरी. शब्बीर तांबोळी. यांच्या सह इतर मान्यवर उपस्थित होते सव्वाद यात्रे कार्यक्रमाचे आयोजन तुषार वाघमारे यांनी केले तर उपस्तित मान्यवरांचे आभार अक्षय बोबडे यांनी मानले.



## मदरसा म्हणजे उद्याचा संक्षम नागरिक घडविण्याचा कारखाना -गणेश कवडे

**पाटोदा । प्रतिनिधी**

अनेक वेळा मदरस्यामध्ये नेमकं चालतंय काय यावर अनेक प्रश्न उपस्थित केला जातो यावर आम्हीही निरत्तर होत होतो. मात्र आज जेव्हा मदरस्यात आलो व येथील परिस्थिती पाहील्यावर येथे आंतकवादी नाहीतर उद्याचा संक्षम नागरिक घडविला जात असून दरवेळेस मुस्लिम समाजालाच किती देशभक्त आहात हे सिध्द करावे लागेल हि खुप मोठी शोकांतिका आहे.जे इंग्रज सरकारने फोडा आणि राज्य करा चे अवलंब केले तेच मानसिकतेतुन काही संघटना समाजामध्ये तेढ निर्माण करण्याचा प्रयत करीत आहे.त्या विचारांना आम्ही फुले,शाहू,आंबेडकरांच्या विचारांने मात केल्या शिवाय राहणार नाही.असे प्रतिपादन युवानेते गणेश कवडे यांनी केले.मदरसा जामिया इस्लामीया बहरूल उलुम येथे आयोजित कार्यक्रमात बोलत होते.



भारत देशाचा ७८ वा स्वातंत्र्या दिन पाटोदा शहरातील मदरसा जामीया इस्लामीया बहरूल उलुम येथे मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.या निमित्ताने लहान मुलांचे एकांकी नाटक,नाथ, मराठी,इंग्रजी भाषेत भाषणे,तसेच चाचणी परिक्षेत यशस्वी विद्यार्थ्या मान्यवरांच्या हस्ते बक्षिस वितरण करण्यात आले. प्रथमता सकाळी ठिक ८ वाजता पाटोदा मरकजचे आमीर सहाब शेख अमानुल्ला सहाब व पुणे येथील जावेद सहाब यांच्या हस्ते राष्ट्रीय ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले. या कार्यक्रमाला पाटोदा शहरातील राजकीय, सामाजिक, तसेच पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. ध्वजारोहणानंतर मदरस्यामधील विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर भाषण व लोकशाही अबाधित ठेवण्यासाठी मतदान किती आवश्यक आहे यावर एकांकी नाटक सादर करून उपस्थितांची मने जिंकली.यावेळी मुफ्ती जफर सहाब यांनी इंग्रज काळात देवबंदच्या माध्यमातून उलेमा इकराम यांनी कसे भारत देशाच्या स्वातंत्र्यासाठी त्याग,बलीदान दिले यावर प्रकाश टाकला तर कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित पुणे येथील जावेद सहाब यांनी मदरस्यामध्ये मराठी, इंग्रजी, गणित विषयांचे शिक्षण देणारे प्रा.सचिन गायकवाड सर व अमजद सर,सलिम सर यांचे कौतुक करत म्हणाले की मी अनेक ठिकाणी गेलो मात्र येथील विद्यार्थ्यांचे मराठी असो किंवा इंग्रजी भाषेचा उच्चाराचा दर्जा उत्तम दिसून येत असल्याने शिक्षकांनी विद्यार्थी घडविण्यात मोठे परिश्रम घेत आहेत हे सिद्ध होत आहे.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मौलाना अब्दुल मौइज,मौलाना मजहर,मौलाना अरबाज,चांदखान पठाण, अमजद पठाण, आयुब मोमिन,फखरूद्दीन भाई आदींनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन मौलाना जहुर यांनी केले.तर आमीर अमानुल्ला सहाब यांच्या दुवाने कार्यक्रम संपन्न झाला.

पान ६ वरून...

### शंभर निराधार वृद्धांची

होत आहेत त्यामुळे सर्वांनी आरोग्य तपासणी करणे गरजेचे आहे. या प्रसंगी जवळपास शंभर वृद्ध निराधार महिला व पुरुषांची मोफत तपासणी करून त्यांना औषधाचे वितरण करण्यात आले. उपस्थित पाहुण्यांचे स्वागत संजना आपेट, सावित्री सागरे यांनी तर कार्यक्रमाचे संचालन शाम सरवदे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी दिलीप मारवाड,बाळू फुलझळके,श्रेया गायकवाड,विद्या गिरी, सायली पटाईत आदीसह इतरांनी परीश्रम घेतले.

### नवनिर्वाचित विश्वस्त मंडळाच्या

ना.धनंजय मुंडे यांच्याकडून शिफारस करण्यात आली होती . तसेच यासाठी माता योगेश्वरी देवीचे निस्सीम भक्त तथा माजी आमदार पृथ्वीराज साठे यांनी देखील प्रयत केले.

देवस्थानास निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल देवल कमिटीच्या संपूर्ण विश्वस्त मंडळाकडून शासन तथा पर्यटन विभागाचे आभार व्यक्त केल्या जात आहेत. त्याचबरोबर उपलब्ध निधीतून जास्तीत जास्त व अतिशय शास्त्रोक्त पद्धतीने सर्व कामे करून घेण्याचा संकल्प देखील कमिटीच्या वतीने करण्यात आला आहे.

### श्रावण पौर्णिमा निमित्त मौजे

यांच्या स्मरणार्थ आशाबाई कैलास वडमारे यांच्या कडून भोजनदान देण्यात येणार आहे. तसेच आयु. प्रवीन अरुण वाघमारे सहशिक्षक फर्दापूर जिल्हा जळगाव यांच्या कडून खिरदान देण्यात येणार आहे. या कार्यक्रमास बीड शहरातील तसेच तालुक्यातील सर्व धम्मप्रेमी बौद्ध उपासक, उपासिका यांनी उपस्थित राहावे असे आवाहन संयोजन समितीच्या वतीने करण्यात आले आहे. महाकारुणीक तथागत भगवान गौतम बुध्दांच्या जीवनात ज्या अनेक अविस्मरणीय घटना घडल्या त्या पैकी एक अग्रश्रावक अंगुलीमालाची धम्मदिक्षा ही एक होय. पौर्णिमांचा आणि चांगल्या घटनांचा भगवंताच्या जीवनात जणु काही माणिक कांचनाचा योग आहे. अंगुलीमालाची धम्मदिक्षाही श्रावण पौर्णिमेसच घडून आली. हा ही एक दुर्मिळ योगायोगच. भगवंताच्या जीवनात अनेक बाबी पौर्णिमेसच घडलेल्या दिसून येतात. तेंव्हा श्रावण पौर्णिमेचे महत्व लक्षात घेता एकंदरीत अशी एक आचरणशील परंपरा निर्मितीसाठी पौर्णिमेचे महत्व जनसामान्यांपर्यंत पोहचविण्याकरीता बौध्द संस्कृती जतनच नव्हे तर तिचे संवर्धन करण्याकरीता विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे.तरी सर्व बौध्द उपासक उपासिकांनी पांढरे शुभ्र वस्त्र परिधान करुन वेळेवर उपस्थित रहावे व धम्मदेसनेने लाभान्वित व्हावे असे आवाहन प्रियदर्शी धम्मसंस्कार शिक्षण संस्था, बीड. वर्षावास संयोजन समिती मौजे शिवणी व शिवणी येथील समस्त बौद्ध उपासक उपासिका यांनी केले आहे.

### मराठवाडा चेबर ऑफ ट्रेड

करण्यात आली.माजलगाव व्यापारी महासंघाचे कार्याची दखल घेऊन माजलगाव येथील मराठवाडा स्थरिय मेळावा असु वा माजलगाव महासंघाच्या मालकीची कार्यालय व इतर संपूर्ण कार्याची पावती म्हणून माजलगाच्या तीन सदस्यांना संधी प्राप्त झाली. माजलगाव तालुका व्यापारी महासंघाच्या सर्व पदाधिकार्यांनी विशेष सहकार्य लाभले. यात बाजार समिती व्यापारी संचलक प्रभाकर होके,महासचिव सुनील भांडेकर,रामेश्वर टवानी,धनराजी बंब,शशिकिरन गडम,गोविंद बजाज,संतोष अब्बाड,संजय कोकड,नारायण सातपुते,शेख सल्लाउदिन, कैलास एलशिट्टी,मोहन घुले,विवेक बजाज,रियाज काजी,व गणेश लोहिया यांनी विशेष प्रयत केले. या निवडी बदल संपूर्ण मराठवाड्यातील पदाधिकारी व व्यापारी बांधवांनी शुभेच्छा दिल्या.

### प्रशासनाच्या आदेशाला

यांची अचानक बदली करून हे प्रकरण दडपण्याच्या मार्गावर असल्याचा आरोप दिंद्रुड ग्रामस्थांनी केला. न्याय मिळत नसल्याने १५ ऑगस्ट पासून दिंद्रुड येथील बस स्थानक परिसरात संजय शिंदे बाबा कांबळे प्रशांत कुलकर्णी रंगनाथ कांबळे व सुखदेव कटारे यांचा सह शेकडो ग्रामस्थ उपोषणास बसले. व्यापाऱ्यांनी गाव बंद करत उपोषणाला पाठिंबा दिल्याने कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला. अखेर तीन दिवस उपोषण झाल्यानंतर माजलगाव प्रभारी तहसीलदारांनी तत्कालीन तहसीलदार वर्षा मनाळे यांच्या एप्रिल महिन्यातील आदेशाला पुन्हा निर्गमित करत उपोषणार्थींना उपोषणापासून परावृत्त होण्यासाठी विनंती केली. या मागणीवर सद्यस्थितीत माजलगाव तहसील ला कायमस्वरूपी तहसीलदार नसल्याने नायब तहसीलदारांची प्रभारी पदी नियुक्ती असल्याचे म्हटले. तहसीलदार रूजू झाल्यानंतर दिंद्रुड च्या फेरफार २१२७ चा फेर रद्द करण्या बद्दल प्राधान्याने सुनावणी घेत गुणवत्तेवर निर्णय पारित करणार असल्याचे आश्वासन माजलगाव तहसील च्या वतीने प्रभारी तहसीलदार आरसुळ यांनी दिल्यानंतर दिंद्रुडकरांनी तूर्तास उपोषण स्थगित केले.

दिंद्रुड च्या बाजार तळाचे प्रकरण न्यायप्रविष्ट असल्यामुळे पुढील आदेश होई पर्यंत बाजारातील वादातीत जागेमध्ये दफनविधी करू नये असा आदेश दि.२५-०४-२४ रोजी तत्कालीन तहसिलदार वर्षा मनाळे यानी दिला होता. सदरील आदेश दि.१७-०८-२४ रोजी प्रभारी तहसिलदार आरसुळ यांनी पुनर्निर्देशित करण्यात आले बाबतचे लेखी पत्र उपोषणार्थींना उपोषण स्थगित करते वेळी दिले.

## रोटरी क्लब ऑफ बीडच्या आरोग्य शिबीरात अडीचशे रुग्णांची तपासणी

**बीड । प्रतिनिधी**

रोटरी क्लब ऑफ बीड व मातोश्री हॉस्पिटल बीड यांच्या संयुक्त विद्यमानाने मोफत ईसीजी टू डी इको बीएसएल शुगर तपासणी शिबिर मातोश्री हॉस्पिटल तुळजाई चौक बीड येथे झाले. या शिबिरात एकूण २३० रुग्णांची तपासणी करण्यात आली. यापैकी ५८ रुग्णांचा टु डी इको करण्यात आला. प्रोजेक्ट चेअरमन डॉ.अमोल जोगदंड व डॉ. सौ.मीनल जोगदंड -पिंगळे व त्यांच्या संपूर्ण टीमच्या व कर्मचाऱ्यांच्या सहकार्यातून हा प्रोजेक्ट यशस्वी करण्यात आला.




प्रोजेक्टचे उद्घाटन रोटरी क्लबचे अध्यक्ष डॉ.मेघराज पिंगळे, सचिव संदीप खोड, क्लब ट्रेनर कल्याण कुलकर्णी, पीडीजी हरीश मोटवानी, पीपी वाय.जनार्दन राव यांच्या उपस्थितीमध्ये झाला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक रो. डॉ.मेघराज पिंगळे यांनी करत रोटरीच्या सामाजिक कार्यावर प्रकाश टाकला. रो.डॉ.अमोल जोगदंड यांनी मेडिकल कॅम्प विषयी संपूर्ण माहिती उपस्थितांना सांगितली. या कार्यक्रमांमध्ये रुग्ण व त्यांचे नातेवाईक इत्यादी उपस्थित होते.

रो.डॉ.बालाजी नवले, विवेक बडगे, ओमप्रकाश लोहिया, संतोष पवार, राजेंद्र मुनोत, प्रमोद करमाळकर, कृष्णा खांडे, सुरज लाहोटी, सुमित जैस्वाल, संदेश लोळगे, सुकेश राव, सुहास बेदरे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कल्याण कुलकर्णी यांनी तर सचिव संदीप खोड यांनी आभार प्रदर्शन केले.

आवश्यक असलेल्या रुग्णांचा टु डी इको

शिबीरात अडीचशे रुग्णांची तपासणी तज्ञ डॉक्टरांनी केली. यावेळी ५८ रुग्णांची टु डी इको तपासणी करणे गरजेचे होते. त्यानुसार ही तपासणी करण्यात आली.

## बालगीत व देशभक्तीपर नृत्य स्पर्धेस उस्फुर्त प्रतिसाद



**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

सर्वज्ञ दासोपंत बालक मंदिर(योगेश्वरी नगरी, परिसर)मध्ये स्वातंत्र्या दिना निमित्त्याने घेण्यात आलेल्या बालगीत व देशभक्तीपर नृत्या स्पर्धेस उस्फुर्त प्रतिसाद लाभला.

यावेळी रोटरॅक्ट क्लबचे डायरेक्टर मयूर परदेसी,एडिटर शिवानंद मोरे,सदस्य सोमेश्वर पाटील,सम्मेद घेवारे,सतीश चौधरी, वासंती बाबजे,शुभांगी राजुरकर अश्विनी बाबजे,शिल्पा भंडारी ,प्रिय गंगणे,शुभांगी शेटे,दीपांजली चौधरी,अनिता काटे,मनीषा चिल्लरगे आदी उपस्थित होते. भारत देशाला गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी क्रांतिकारकांनी स्वतःच्या जीवाचे बलिदान दिले म्हणून देशाला स्वातंत्र्या मिळाले आणि त्यांनी तिरंगी ध्वज फडकावला. आता पुढील काळात देशातील नागरिकांनी एकत्र राहून देश बळकट बनविला पाहीजे आपल्या देशात भरपूर झाडे लावावीत देश स्वच्छ ठेवावा प्लास्टिक मुक्त करावा असे मत वासंती बाबजे यांनी व्यक्त केले. शुभांगी राजुरकर म्हणाल्या की,आपला देश निरोगी आणि बळकट ठेवावा, विद्यार्थ्यांनी नेहमी सत्याच्या मार्गावर चालत राहावे. रोट्रॅक्ट क्लब ऑफ अंबाजोगाई सिटीच्या वतीने विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह,प्रमाणपत्र वितरीत करण्यात आले.

# पश्चिम महाराष्ट्रापेक्षा विदर्भात दूध सकलन खूपच कमी

## प्रतिदिन २० लीटर दूध देणारे पशुधन विकसित करा, मंत्री गडकरींचं आवाहन

विदर्भातील सर्व जिल्ह्यांमध्ये दूध संकलन वाढण्यासाठी विद्यापीठ आणि संशोधन संस्थांनी नव संशोधनाद्वारे पुढाकार घ्यावा असे मत केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी व्यक्त केलं. ते नागपुरात बोलत होते. विदर्भातील ११ जिल्ह्यांमधील दूध संकलन हे प्रतिदिवशी ५ लाख लिटर आहे. हे संकलन पश्चिम महाराष्ट्रातील कोल्हापूर सातारा सांगली यांच्या तुलनेत खूपच कमी असल्याचे गडकरी म्हणाले.

विदर्भात दुधाचे संकलन वाढवण्यासाठी, महाराष्ट्र पशु विज्ञान आणि मत्स विज्ञान विद्यापीठ – माफसू तसेच अकोल्यातील डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ यांनी 'काऊ फार्म्स' निर्माण करून देशी वाणाच्या गायींचे 'इम्ब्रीयो ट्रान्सफरच्या माध्यमातून शासकीय पशुवैद्यकीय दवाखान्यांमध्ये खाजगी सार्वजनिक भागीदारी- पीपीपी प्रारूपाच्या आधारे पशुवैद्यकीय तंत्रज्ञांच्या मदत घ्यावी. यांच्या मदतीनं विदर्भात किमान २० लीटर प्रतिदिन दूध देणाऱ्या १० हजाराच्यावर पशुधन विकसित करावे असे आवाहन नितीन गडकरी यांनी केले. नागपूरच्या सेमिनरी हिल्स येथील माफ्सूच्या सभागृहात इंडियन डेअरी असोसिएशन वतीने आयोजित दुग्ध व्यवसायावरील राष्ट्रीय परिषदेत ते आज संबोधित करत होते. याप्रसंगी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन पाटील ,भारतीय कृषी विज्ञान परिषदेचे





उपमहासंचालक डॉ. राघवेंद्र भट, नॅशनल डेअरी डेव्हलपमेंट बोर्डचे अध्यक्ष मिनेश शहा, इंडियन डेअरी असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. आर एस सोधी उपस्थित होते.

विदर्भाच्या ११ जिल्ह्याच्या ३ हजार गावांमधून प्रतिदिन ५ लाख लिटर दुधाचं संकलन

विद्यापीठ आणि संशोधन संस्थानी तंत्रज्ञानाचा वापर हा तळागाळापर्यंत पोहोचवणे आवश्यक आहे. सिद्ध झालेलं तंत्रज्ञान, त्याची आर्थिक व्यवहारिता, कच्च्या मालाची उपलब्धता आणि अंतिम उत्पादनाचे उत्तम विपणन या गोष्टीवर भर देऊन दुग्ध व्यवसायाला चालना देण्याचा प्रयत्न डेअरी व्यवसायाशी तसेच डेअरी संशोधनाशी संबंधित संस्थांनी करावा, असे देखील गडकरी यांनी यावेळी नमूद केले.

नागपूरच्या बुटीबोरीत ६ लाख लिटर प्रति दिवस क्षमतेचा दुध प्रक्रिया प्रकल्प सुरु होणार

एनडीडीबीच्या प्रकल्पाद्वारे विदर्भाच्या ११ जिल्ह्याच्या ३ हजार गावांमधून ५ लाख लिटर प्रति दिवस दूध संकलन होत आहे. नागपूरच्या बुटीबोरी येथे ६ लाख लिटर प्रति दिवस क्षमतेचा दुध प्रक्रिया प्रकल्पासाठी जमीन मिळाली असून या प्रकल्पाची क्षमता १० लाख प्रति लिटर प्रति दिवस करण्याचा मानस असल्याचे मत एनडीडीबीचे अध्यक्ष मिनिश शहा यांनी व्यक्त केले. पुढील वर्षापासून या प्रकल्पाचे संचालन होणार असून या माध्यमातून पनीर, दही, मिठाईचे उत्पादन होणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. या कार्यक्रमाप्रसंगी सर्वश्रेष्ठ डेअरी प्लांटचा पुरस्कार हा महाराष्ट्रातील कोल्हापूर जिल्हा दूध उत्पादक संस्थेला मिळाला तर उत्कृष्ट महिला शेतकरी पुरस्कार मनाली रेडेकर यांना मिळाला. याप्रसंगी गडकरींच्या हस्ते माफ्सू वार्ता तसेच विद्यापीठाच्या संशोधनाची माहिती असलेल्या घडी पत्रिकेचे प्रकाशन करण्यात आले. काही तंत्रज्ञान हस्तांतरण तसेच संशोधन संस्थाअंतर्गत सामंजस्य करारावर देखील गडकरींच्या उपस्थितीत याप्रसंगी स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. या परिषदेमध्ये माफसूचे अधिकारी, शिक्षक, विद्यार्थी, डेअरी व्यवसायाशी संबंधित व्यावसायिक, तंत्रज्ञ आणि शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# बेकिंग सोडा शेतकऱ्यांसाठी वरदान

## शेतात आणि बागेमध्ये या १० प्रकारे करा वापर

सामान्यता बेकिंग सोड्याचा वापर स्वयंपाकात केला जातो. परंतु तुम्हाला माहित आहे का पिकांच्या चांगल्या वाढीसाठी बेकिंग सोडा बागायतदारांसाठी खूप फायदेशीर ठरत आहे. वास्तविक, शेतात बेकिंग सोड्याचा वापर करून शेतकरी कमी खर्चात त्यांच्या पिकांची चांगली वाढ करू शकतात. जाणून घेऊ या बागेत आणि शेतात बेकिंग सोडा वापरण्याच्या १० सर्वोत्तम पद्धती.

बेकिंग सोडा वापरण्याच्या पद्धती आणि फायदे :

पावडर मिल्ड्यू ज्याला आपण मराठीत भूरी रोग म्हणतो सारख्या बुरशीजन्य रोगांवर बेकिंग सोडा पाण्यात आणि द्रव साबणामध्ये मिसळून आणि वनस्पतींवर फवारणी करून नियंत्रित केले जाऊ शकते. तण मारण्यासाठी जवळच्या झाडांना इजा न करता थेट बागेतील तणांवर बेकिंग सोडा वापरू शकता. बेकिंग सोडा आणि मैदा यांचे मिश्रण झाडांवर फवारल्याने कोबी वरील अळ्या आणि मावा सारख्या कीटकांना प्रतिबंध करता येतो. बेकिंग सोडाचा वापर अती आम्लीय मातीला सुधारण्यासाठी, वनस्पतींच्या वाढीसाठी व पर्यावरण सुधारण्यासाठी केला जाऊ शकतो. मातीची आम्लता कमी करण्यासाठी टोमॅटोच्या झाडांभोवती बेकिंग सोडा शिंपडल्यास टोमॅटो अधिक गोड होतील. बेकिंग सोड्याच्या वापरणे जमिनीचे पर्यावरण अधिक अल्कधर्मी बनते त्यामुळे कंपोस्ट प्रक्रिया जलद होते. कंपोस्ट खत असलेल्या भागात बेकिंग सोडा शिंपडून बागांमध्ये दुर्गंधी नष्ट केली जाऊ शकते. बेकिंग सोडा पेस्टने बागकामाची साधने साफ करणे खूप सोपे आहे. यामुळे घाण आणि गंज काढले जाते.

# तूर पिकात उत्पादनात वाढ करण्यासाठी हे करा

तूर पीक हे भारतातील एक महत्त्वाचे कडधान्य पीक आहे. पण अनेकदा उत्पादनात घट येण्याच्या अनेक समस्या येतात. खाली काही महत्त्वाच्या समस्या आणि त्यावर उपाययोजना दिल्या आहेत दोन झाडांतील अंतरानुसार मजुरांद्वारे खांडण्या भरणे आवश्यक आहे. काही ठिकाणी डोबणी २-३ वेळा करून खांडण्या बुजवणे आवश्यक आहे.

निंदणी : ट्रॅक्टर किंवा बैलजोडीने पेरणी केलेल्या तूर पिकाची निंदणी वेळीच करणे आवश्यक आहे. सोयाबीनसोबत आंतरपीक असल्यास सोडओळ (पट्टापेर) पद्धतीचा अवलंब करणे आवश्यक आहे.

शेंडे छाटणे : पीक २५ ते ३० दिवसांचे असताना शेंडे छाटून घ्यावेत. अलीकडे शेंडे छाटण्याची सुरक्षित अशी छोटी यंत्रे उपलब्ध आहेत. छाटणी केल्यानंतर बुरशीनाशकाची फवारणी करणे आवश्यक आहे.

पाणी व्यवस्थापन : शेवरा अवस्थेपूर्वी आणि शेंगांमध्ये दाणे भरताना ओलीत करणे आवश्यक आहे. जमिनीत मुबलक ओल असल्यासच शेंडे छाटणे आवश्यक आहे.

रोग आणि किडींचे नियंत्रण : शेवरा अवस्थेच्या सुरुवातीला, फुलोरा अवस्थेच्या सुरुवातीला आणि शेंगांमध्ये दाणे भरताना योग्य कीटकनाशकांचा वापर करणे आवश्यक आहे.

इतर महत्वाच्या गोष्टी : तूर लागवडीसाठी जोडओळ पद्धतीचा अवलंब करणे आवश्यक आहे. बीटी कपाशी आणि तूर यांच्यातील आंतरपीक पद्धतीमध्ये दोन्ही पिकांची जोडओळ पद्धतीने पेरणी करणे आवश्यक आहे. योग्य वेळी आणि योग्य प्रमाणात खते आणि सूक्ष्मजीवके देणे आवश्यक आहे. योग्य वेळी आणि योग्य तंत्रज्ञानाचा वापर करून काढणी करणे आवश्यक आहे. यांचा अवलंब केल्याने तुमच्या तूर पिकाचे उत्पादन निश्चितच वाढवता येईल.




# पावसाळ्यात गाभण शेळ्याची कशी काळजी घ्यावी?

शेळीपालनाचे यश कळपामध्ये जन्माला येणाऱ्या करडांवर अवलंबून असते. त्यासाठी शेळी गाभण असणे आवश्यक आहे. दोन वर्षाला तीन वेळेस शेळी व्याली पाहिजे.

शेळीपालनाचे यश कळपामध्ये जन्माला येणाऱ्या करडांवर अवलंबून असते. त्यासाठी शेळी गाभण असणे आवश्यक आहे. दोन वर्षाला तीन वेळेस शेळी व्याली पाहिजे. शेळीपालन व्यवसायामध्ये संगोपनाला जितके महत्त्व आहे तितकेच महत्त्व गाभण शेळीच्या आरोग्य व व्यवस्थापनेला सुद्धा आहे. पावसाळ्यात गाभण शेळ्यांची विशेष काळजी घ्यावी लागते.

गाभण शेळ्यांचा आहार : चांगल्या वजनाची सशक्त करड जन्मण्यासाठी गाभण काळातच शेळीचे योग्य व्यवस्थापन करावे. गाभण शेळ्यांना वाळलेला ओला चारा, खुराक व खनिज मिश्रण यांचा पुरवठा योग्य प्रमाणात करणे आवश्यक आहे. गाभण शेळ्यांना सहज पचणारा चारा योग्य प्रमाणात पशुखाद्य द्यावा. गाभण काळातील शेवटचे किमान १ महिना व्यायच्या अगोदर समतोल आहाराचा पुरवठा करावा व गोठ्यातच फिरण्याची सोय असणे गरजेचे आहे. गाभणकाळात शेवटच्या ३-४ आठवड्यामध्ये गर्भाशयातील पिल्लांचा उत्तम वाढीसाठी उत्तम प्रतीचा चाऱ्याबरोबरच दररोज २५० ते ३५० ग्राम खुराक द्यावा. स्वच्छ पाणी द्यावे.



थंड पाणी किंवा पावसाचे पाणी देऊ नये त्यामुळे शेळीला सर्दी सारखे आजार होऊ शकतात. शक्यतो पावसाळ्यात गाभण शेळ्यांना सुका चारा द्यावा जसे कि भरडलेला मका, गहू सोयाबीन यांचे मिश्रण करून द्यावे.

गाभण शेळ्यांची लक्षणे : एक वेळ गाभण गेलेली शेळी पुढील २१ दिवसात परत माजावर येत नाही. तीन महिन्यांनंतर शेळीचे पोट वाढू लागते व तसेच शेळीचे वजन वाढलेले दिसून येते. शेळी गाभण झाल्यावर तिची त्वचा तजेलदार होते. शेळी गाभण आहे की नाही हे ओळखण्यासाठी नवीन पद्धतीमध्ये एक्सरे, सोनोग्राफी, लॅप्रोस्कोपी या तपासण्या खूपच विश्वसनीय मानल्या जातात. शेवटच्या गाभण काळात शेळीची कास मोठी होते.

गोठ्याचे व्यवस्थापण: गाभण शेळ्यांना इतरांपासून वेगळ्या जागी ठेवावे. सध्याचा हवामानात शेळ्यांचे पावसापासून तसेच आद्रतायुक्त हवेपासून बचाव करण्यासाठी गाभण शेळ्यांचा गोठ्यात उबदार वातावरण रहावे म्हणून साधारण २ ते ४ उंची पर्यंत १०० ते २०० पावरचे बल्ब लावावेत. रात्रीच्यावेळी गोठ्यात वाळलेले गवत, उसाचे पाचट अंथरावे जेणेकरून जमिनीतील गारवा व ओलसरपणा याचा गाभण शेळ्यांना त्रास होणार नही. गाभण असनाऱ्या शेळ्या बसण्याची जागा मलमुत्रामुळे ओली होते अशा ओलसर ठिकाणी आठवड्यातुन एक दोन वेळा चुन्याची भुकटी टाकावी. त्यामुळे गोठ्यात असलेले जीवाणू, विषाणू यांचा प्रादुर्भाव गाभण शेळ्यावर कमी होतो. पावसाळ्यात गाभण शेळ्यांना होणारे आजार व उपचार : गाभण शेळ्यांमध्ये पावसाळ्यात गर्भपात, अंग बाहेर येणे, पोटफुगी, आंत्रविषार, बुळकांडी, अपचन, अशा प्रकारचे आजार उद्भवतात. पावसाळ्यात आर्द्रतेचे प्रमाण जास्त असल्यामुळे शेळ्यांना श्वसनाचे आजार होण्याची दाट शक्यता असते. गोठ्यातील जमीन ओली असेल तर खुरांमध्ये ओलसरपणा राहून शेळ्यांचा खुरामध्ये जखमा होतात. पावसाळ्यात हिरवा ओला चारा जास्त प्रमाणात उपलब्ध असतो त्यामुळे गाभण शेळ्यांमध्ये अंग बाहेर येणे हा आजार मोठ्या प्रमाणात आढळून येतो असे असल्यास पशुवैद्याकाकडून योग्य उपचार करून घ्यावेत.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

२९५ : २९५ ई.पूर्व: प्रेम, सौंदर्य आणि प्रजनन यांची रोमन देवी व्हीनस चे पहिले मंदिर पूर्ण झाले.
१८५६ : गेल बॉर्डन या शास्त्रज्ञाला दुधाच्या शीतकरण प्रक्रियेचे पेटंट मिळाले.
१९०९ : इंडियानापॉलिस मोटर स्पीडवे येथे मोटारींची पहिली शर्यत झाली.
१९१९ : अफगाणिस्तानला (युनायटेड किंगडमपासुन) स्वातंत्र्य मिळाले.
१९४५ : हो ची मिन्ह व्हिएतनामच्या सत्तेवर आले.
१९६४ : केप कॅनॅवरल येथून डेल्टा डी २५ या प्रक्षेपण वाहनाने सिंकॉम३ हा पहिला जिओस्टेशनरी कम्युनिकेशन उपग्रह प्रक्षेपित करण्यात आला.
१९७३ : फ्रांस देशाने आण्विक चाचणी केली.
१९९१ : सोविएत संघाच्या राष्ट्राध्यक्ष मिखाईल गोर्बाचेव्हला फोरोस येथे सुटीवर असताना नजरकैदेत घातले गेले.
१९९९ : बेलग्रेड, युगोस्लाव्हिया येथे हजारो सर्बियन लोकांनी राष्ट्राध्यक्ष स्लोबोदान मिलोसेव्हिच यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी आंदोलन केले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८७१ : ऑर्व्हिल राईट आपला भाऊ विल्बर राईट याच्यासह इंजिनाच्या विमानाचा शोध लावणारे अमेरिकन अभियंते (मृत्यू: ३० जानेवारी १९४८)
१८७८ : फिलिपाईन्सचे राष्ट्राध्यक्ष मनुएल क्वेझोन यांचा जन्म.
१८८३ : पोर्तुगालचे राष्ट्राध्यक्ष जोसेमेंडेस काबेसादास यांचा जन्म.
१८८३ : चॅनेल कंपनी चे संस्थापिका कोको चॅनेल यांचा जन्म. (मृत्यू: १० जानेवारी १९७१)
१८८६ : मोरेश्वर वासुदेव तथा नरकेसरी अभ्यंकर स्वातंत्र्यसैनिक, टिळकांच्या विचारसरणीचे मध्य प्रांताचे काँग्रेस नेते, वकील (मृत्यू: २ जानेवारी १९३५)
१८८७ : भारतीय वकील आणि राजकारणी एस. सत्यमूर्ति यांचा जन्म. (मृत्यू: २८ मार्च १९४३)
१९०३ : गंगाधर देवराव खानोलकर लेखक व चरित्रकार, 'अर्वाचीन मराठी वाङ्मय सेवक' या कोशाचे सात खंड त्यांनी प्रकाशित केले. (मृत्यू: ३० सप्टेंबर १९९२)
१९०७ : सरदार स्वर्ण सिंग केन्द्रीय मंत्री (मृत्यू: ३० आक्टोबर १९९४)
१९०७ : भारतीय इतिहासकार, लेखक, आणि विद्वान हजारी प्रसाद द्विवेदी यांचा जन्म. (मृत्यू: १९ मे १९७९)
१९०८ : पद्मभूषण पुरस्कार तसचं, संगीत नाटक अकादमी पुरस्कार सन्मानित प्रसिद्ध भारतीय शास्त्रीय ठुमरी गायक उस्ताद अब्दुल रशीद खान यांचा जन्मदिन.
१९११ : प्रसिद्ध भारतीय कवी, कथाकार, आणि एकांकीकार आरसी प्रसाद सिंह यांचा जन्मदिन.
१९१३ : भारतीय-इंग्लिश सैनिक व लेखक पीटर केम्प यांचा जन्म. (मृत्यू: ३० ऑक्टोबर १९९३)
१९१८ : शंकरदयाळ शर्मा भारताचे ९ वे राष्ट्रपती व ८ वे उपराष्ट्रपती (मृत्यू: २६ डिसेंबर १९९९)
१९२१ : स्टार ट्रेक कथानकाचे निर्माते जीन रॉडेनबेरी यांचा जन्म.
१९२२ : मराठी गायक बबनराव नावडीकर यांचा जन्म.
१९२८ : प्रसिद्ध भारतीय हिंदी भाषिक लेखक,कादंबरीकार, लघुकथा लेखक, व टीकाकार प्राध्यापक शिवप्रसाद सिंह यांचा जन्मदिन.
१९४६ : बिल क्लिंटन अमेरिकेचे ४६ वे राष्ट्राध्यक्ष
१९५० : पद्मश्री पुरस्कार सन्मानित इन्फोसिस फाऊंडेशनच्या अध्यक्ष, व्यावसायिक भारतीय अभियांत्रिकी शिक्षिका, आणि कन्नड व इंग्रजी भाषिक लेखक सुधा मूर्ती यांचा जन्मदिन.
१९६७ : भारतीय आध्यात्मिक नेते खांड्रो रिनपोछे यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१४ १४ ई.पुर्व : रोमन सम्राट ऑगस्टस सीझर यांचे निधन.
१४९३ : पवित्र रोमन सम्राट फ्रेडरिक (तिसरा) यांचे निधन.
१६६२ : ब्लेझ पास्कल फ्रेन्च गणितज्ञ आणि तत्त्वज्ञ (जन्म: १९ जून १६२३)
१७५७ : ब्रिटीश कालीन भारतात इंग्रज सरकारच्या इस्ट इंडिया कंपनीने कलकत्ता येथे एक रुपयाची नाणी तयार केली.
१९०६ : ब्रिटीश कालीन भारतातील बॉम्बे हायकोर्टाचे बॅरिस्टर म्हणून सराव करणारे पहिले भारतीय व्यक्ती तसचं, भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे तिसरे अध्यक्ष व पहिले मुस्लीम अध्यक्ष बद्रुद्दीन तैबजी यांचे निधन. (जन्म: १९ जानेवारी १९०६)
१९४७ : विनायक दामोदर कर्नाटकी ऊर्फ 'मास्टर विनायक' अभिनेते, दिग्दर्शक व निर्माते. त्यांनी २२ चित्रपटातून भूमिका केल्या तर २९ चित्रपट दिग्दर्शित केले. (जन्म: १९ जानेवारी १९०६)
१९५४ : इटलीचे पंतप्रधान ऍल्सिदेदि गॅस्पेरी यांचे निधन.
१९४७ : अभिनेते, दिग्दर्शक आणि निर्माते मास्टर विनायक यांचे निधन. (जन्म: २९ जानेवारी १९०६)
१९७५ : डॉ. विनायक विश्वनाथ तथा 'अप्पासाहेब' पेंडसे शिक्षणतज्ञ, देशभक्त, तत्त्वज्ञ, कुशल संघटक, लेखक, पत्रकार आणि 'ज्ञानप्रबोधिनीचे संस्थापक (जन्म: १७ ऑगस्ट १९१६)
१९८३ : भारतीय शिक्षणतज्ञ, देशभक्त, कुशल संघटक, लेखक, पत्रकार व राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सदस्य डॉ. विनायक विश्वनाथ उर्फ 'अप्पासाहेब' पेंडसे यांचे
१९९० : रा. के. लेले पत्रकार, संशोधक आणि मराठी वृत्तपत्रांच्या इतिहासाचे लेखक (जन्म:)
१९९३ : उत्पल दत्त रंगभूमी आणि चित्रपट या दोन्ही माध्यमात आपला ठसा उमटवणारे कलाकार (जन्म: २९ मार्च १९२९)
१९९३ : य. द. लोकुरकर निर्भिड पत्रकार (जन्म:)
२००० : भारतीय कवी, लेखक, आणि शिक्षक बिनेंश्वर ब्रह्मा यांचे निधन. (जन्म: २८ फेब्रुवारी १९४८)
२०१३ : न्युझीलंड येथील प्रसिद्ध हिंदी साहित्यकार, भाषा विज्ञानी, व्याकरणकार तसचं, ऑक्सफोर्ड या हिंदी-इंग्रजी शब्दकोशाचे संपादक रोनाल्ड स्टुअर्ट मेक्ग्रेगॉर यांचे निधन.
२०१५ : भारतीय कार्यकर्ते आणि राजकारणी सनत मेहता यांचे निधन.

# मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा ऑनलाईन राज्यस्तरीय शुभारंभ

## बीड येथे ऑनलाईन पद्धतीने झालेल्या कार्यक्रमात लाभार्थी बहिणींची उपस्थिती

बीड । प्रतिनिधी

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण या योजनेचा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते तर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांच्यासह मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत पुणे येथील बालेवाडीतून या योजनेचा राज्यस्तरीय शुभारंभ शनिवार दिनांक १७ ऑगस्ट २०२४ रोजी दुपारी २ वाजता संपन्न झाला. या योजनेचा राज्यस्तरीय शुभारंभ ऑनलाईन पद्धतीने बीड येथील जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन सभागृहामध्ये बीडचे जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांच्या प्रमुख उपस्थितीत लाभार्थ्यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. याप्रसंगी जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी या योजनेबद्दल सरकार आणि सर्व मान्यवर लाभार्थी यांचे आभार व्यक्त केले.

जिल्हाधिकारी यांना राखी बांधून लाभार्थी महिलांनी या अभूतपूर्व योजनेचे स्वागत केले. बीड येथील जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन सभागृहामध्ये महाराष्ट्र शासनाचा महत्वकांक्षी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण या योजनेचा राज्यस्तरीय ऑनलाइन शुभारंभ महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांच्या



शुभहस्ते संपन्न झाला. यावेळी महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह महिला व बालविकास विभागाच्या मंत्री अदिती तटकरे, विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, दिलीप वळसे पाटील, चंद्रकांत पाटील,खा. सुनील तटकरे साहेब यांच्यासह प्रमुख प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. महिलांना खऱ्या अर्थाने आर्थिक सबलीकरण करणाऱ्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण या योजनेचा ऑनलाईन राज्यस्तरीय शुभारंभ प्रसंगी जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये बीडचे जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांच्यासह बीड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी संगीता देवी पाटील, उपमुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव सोळुंके, निवासी उपजिल्हाधिकारी शिवशंकर स्वामी, उपजिल्हाधिकारीओंकार देशमुख , कार्यक्रम अधिकारी तथा महिला व बालविकास अधिकारी चंद्रशेखर केकान यांच्यासह मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचे बीड विधानसभा अध्यक्ष अमर नाईकवाडे, आष्टी विधानसभा अध्यक्ष तथा बीड जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष डॉ.शिवाजी राऊत, गेवराई विधानसभा अध्यक्ष रवींद्र गाडे यांच्यासह अशासकीय सदस्य फारूक पटेल, पिंटू उर्फ सुनील पोपळे, गजानन काळे, शंकर तपसे, सारंग आंधळे, रवींद्र तांदळे यासह मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

याप्रसंगी कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात कार्यक्रमाधिकारी चंद्रशेखर केकाण म्हणाले, मागील दीड महिन्याच्या कालावधीमध्ये ३ लाख ५२ हजार २८७ लाभार्थी बहिणींनी या योजनेअंतर्गत ऑन लाईन अर्ज भरले. यापैकी ३ लाख ४१ हजार ४९८ लाभार्थी बहिणींना या योजनेचा पहिला लाभ प्रत्येकी ३००० चा दोन महिन्यांचा एकत्रित हप्ता त्यांच्या थेट खात्यामध्ये जमा झाला आहे. ऑनलाइन प्रक्रियेत काही त्रुटी असल्यामुळे जे लाभार्थी अद्याप वंचित आहेत त्यांना देखील त्या त्रुटी दूर करून या योजनेचा लाभ मिळणार आहे. १००% बीड जिल्ह्यातील बहिणींना लाभ मिळेल या संदर्भात प्रशासन आणि शासकीय कमिटी प्रयत्नशील आहे. या योजनेला सप्टेंबर पर्यंत मुदतवाढ दिली असल्यामुळे सर्वांना या योजनेचा लाभ मिळेल.यासाठी प्रशासकीय पातळीवर युद्धपातळीवर प्रयत्न करण्यात येतील असे स्पष्ट केले. याप्रसंगी प्रातिनिधिक स्वरूपामध्ये वैशाली केंगाट,रेखा बाबर, अर्पणा स्वामी, शुभांगी पांडे या लाभार्थी महिलांनी आपल्या मनोगतामध्ये मुख्यमंत्र्यांचे आभार मानून आम्ही आता अबला नसून सबला होणार असल्याबद्दल आणि राखी पौर्णिमेपूर्वी मुख्यमंत्र्यांनी आमच्या पाठीशी भाऊ म्हणून जी आर्थिक बळकटीची ताकद दिली आहे ती आम्हाला भविष्यात सक्षम करेल असा विश्वास व्यक्त केला.त्याच बरोबर या योजनेत २१ वर्षापासून पुढील मुलींनाही मुख्यमंत्र्यांनी बहीण म्हणून संधी दिल्यामुळे शिक्षण घेत असलेल्या गरीब मुलींना या योजनेचा खऱ्या अर्थाने लाभ मिळेल याबद्दल विशेष आभार व्यक्त केले.

ऑनलाइन या योजनेच्या राज्यस्तरीय शुभारंभ कार्यक्रमानंतर बीडचे जिल्हाधिकारी अविनाश पाठक म्हणाले स्त्री ही आदिशक्तीचे प्रतीक आहे. ती अबला कधीच नव्हती आणि नाही.स्त्री ही नऊ रूपामध्ये आदिशक्तीच्या माध्यमातून आपणास ठिकठिकाणी पाहावयास मिळते. तिच्याशिवाय निर्मितीच नाही.तिचे महत्त्व अनन्यसाधारण आहे.महाराष्ट्र सरकारने राज्यातील महिलांना आर्थिक सबलीकरण करण्यासाठी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण या योजनेच्या माध्यमातून प्रत्येक महिलेला तिच्या खात्यावर दरमहा पंधराशे रुपये मानधन सुरू करून तिला खऱ्या अर्थाने प्रगतीच्या उंबरठ्यावर उभे केले आहे. त्यामुळे मी या योजनेबद्दल महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस ,उपमुख्यमंत्री अजित पवार साहेब,महिला व बालविकास विभागाच्या मंत्री आदिती तटकरे, बीड जिल्ह्याचे पालकमंत्री तथा कृषी मंत्री धनंजय मुंडे यासह ही योजना पूर्णत्वास नेणारे राज्य स्तरापासून बीड जिल्हा स्तरापर्यंत सर्व प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी, या योजनेवरील अशासकीय कमिटीचे अध्यक्ष, सदस्य, महिला व बालविकास विभागातील अधिकारी, कर्मचारी या सर्वांचेच आणि लाभार्थी महिलांचे देखील मी आभार व्यक्त करतो, असे मनोगत व्यक्त केले.कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी लाभार्थी सर्व महिलांनी जिल्हाधिकारी आणि व्यासपीठावरील सर्व मान्यवरांना राखी बांधून या उपक्रमाचे स्वागत आणि अभिनंदन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विस्तार अधिकारी रमा खोड आणि प्रा. श्रीराम जाधव यांनी केले.कार्यक्रमाचे आभार महिला व बालविकास विभागाच्या सुनंदा तांदळे यांनी मानले.

# अंबड पोलीस ठाण्याचे नवीन पो नि. सतीश जाधव रुजू

अंबड । प्रतिनिधी

अंबड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक रघुनाथ नाचन यांची बदलीनंतर नवीन आलेले पोलीस निरीक्षक सतीश जाधव यांनी आज अंबड पोलीस ठाण्याचे पदा पदभार स्वीकारला त्यांचे स्वागत पोलीस प्रशासन व राजकीय क्षेत्रातील पदाधिकारी यांचे स्वागत केलं. स्थापन करण्यात आलेल्या जिल्हयास्तरावरील पोलीस आस्थापना मंडळास सदर अध्यादेशामधील कलम-२२- जे-२ मध्ये नमूद केल्याप्रमाणे पोलीस निरीक्षक दर्जापर्यंतच्या पोलीस अधिका-यांच्या जिल्हयांतर्गत सर्व बदल्या करण्याबाबत प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार जिल्हा पोलीस आस्थापना मंडळाने प्रशासकीय तसेच कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीकोनातून बदलीने रिक्त पदे भरणे ईत्यादी काळजीपुर्वक व सर्वांगिण विचार करुन बदल्या करण्याबाबत दिलेल्या मान्यतेनुसार खालील प्रमाणे निःशस्त्र पोलीस निरीक्षक यांच्या त्यांच्या दर्शविण्यात उराले प्रमाणे विनंतीवरुन बदल्या करण्यात येत आहेत.



पोनि/सतोश शिवाजीराव जाधव सद्याची नेमणुक जि.वि.शा.जालना विनंतीवरुन बदलीचे ठिकाण पो.स्टे. अंबड इथे करण्यात आली आहे तरी, वर नमूद पोलीस अधिकारी यांनी बदलीच्या ठिकाणी तात्काळ हजर होऊन अनुपालन अहवाल सादर करावा, तसेच, संबंधीत प्रभारी अधिकारी यांनी वर नमुद पोलीस अधिकारी यांना नविन नेमणुकीच्या ठिकाणी हजर होणेसाठी तात्काळ कार्यमुक्त करुन कार्यमुक्त केल्याबाबतचा व नवीन बदलीच्या ठिकाणी हजर झाले बाबतचा अनुपालन अहवाल त्वरीत या कार्यालयास सादर करावा, व पोनि/सतीश शिवाजीराव जाधव ने.जि.वि.शा. जालना यांनी त्यांचे कडील चार्ज पुढील आदेशापावेतो निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात सपोनि महादेव चव्हाण ने. जिविशा, जालना यांचे कडे देऊन चार्ज घेतल्याचा व चार्ज दिल्याचा अहवाल या कार्यालयास सादर करावा. असे आदेश पोलीस अधीक्षक अजय कुमार वंसल यांनी केले

# मुख्याधिकारी मनोज उकिरडे यांच्या हस्ते ध्वजारोहण



अंबड । प्रतिनिधी

१५ ऑगस्ट रोजी नगरपरिषद अंबड च्य मुख्य प्रशासकीय इमारत या ठिकाणी ध्वजारोहणाचा कार्यक्रम संपन्न झाला. नगर परिषदेचे मुख्याधिकारी तथा प्रशासक श्री मनोज उकिरडे यांच्या शुभहस्ते ध्वजारोहण पार पडले. प्रथम राष्ट्रपिता महात्मा गांधी व महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून ध्वजारोहण करण्यात आले. राष्ट्रगीत पूर्ण झाल्यानंतर महाराष्ट्र गीत गायन करण्यात आले. कार्यक्रमास केदार कुलकर्णी, शिवप्रसाद चांगले , जाकेर डावरगावकर,अरुण उपाध्ये संदीप खरात, हनुमान धांडे, विठ्ठलसिंग राणा, सुरेश गुडे,शाहुल खरात, मनोज साळवे यांची प्रमुख उपस्थिती सह इतर पदाधिकारी उपस्थित होते. कार्यालयीनअधीक्षक श्री. सुधीर जाधव, सहायक प्रकल्प अधिकारी श्री. संजीव मैंद, इंजिनीयर सर्वश्री सुशील भालेराव प्रवीण शिंदे, बेडवाल साहेब, लेखापाल श्री विकास घावटे, गोपाल चौधरी, शरद मगर, जितेंद्र देशमुख,संतोष खरात, विलास खरात, अमर खरात, विठ्ठल गोगरड, आत्माराम सांगळे, रामदास मांडवे यांच्या सह सर्व कर्मचारी वर्ग उपस्थित होते.

# गरिबांचे कामे मार्गी लागण्याच्या अपेक्षा- तहसीलदार चव्हाण




अंबड । प्रतिनिधी

अंबडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्या बदलीनंतर अंबड येथे नवीन तहसीलदार विजय चव्हाण रुजू झाले असून त्यांच्याशी झालेली चर्चा यावेळी बोलताना ती म्हणाली की मोठ्या लोकांचे काम कोणीही करतं परंतु सर्वसामान्य गरिबांचे काम कोणीही करीत नाही करता मी सर्वसामान्यांना पदाच्या माध्यमातून गरिबांना न्याय मिळून देण्याचे काम करणार आहे असे ते म्हणाले.

एमपीएससीमार्फत आपली फौजदारपदी निवड झाल्यानंतर २ वर्षे या पदावर कामही केले. सर्वसामान्य गरिबांचे काम करण्यासाठी महसूल विभाग मध्ये काम करण्यासाठी माझी इच्छा होती म्हणून मी या क्षेत्राकडे आलो आहे तहसिलदार विजय चव्हाण म्हणाले की, पोलीस खात्यातील पदपिक्षा महसूल खात्यातील तहसिलदार हे पद गरिबांना न्याय मिळवण्यासाठी असतं असे ते म्हणाले एमपीएससीमार्फत मी फौजदारपदी निवड झाल्यानंतर २ वर्षे या पदावर काम केले आहे. आता यानंतर मला सर्वसामान्य गरीब व्यक्तीचे व शेतकऱ्यांचे रस्त्याचे बांधाचे अतिक्रमांचे काम नियमाप्रमाणे करणार असल्याचे त्यांनी सांगितले आपली कार्यपध्दती कोणाच्या दबावाखाली काम करणार नाही तर धडक स्वरूपाची असून, आपण एकदा चुकीच्या कामाच्या विरोधात कारवाई हाती घेतली तर माघार घेतच नाही, असेही ते म्हणाले. तहसीलदार विजय चव्हाण यांनी सन २००६ ते २०११ या काळात मुंबई पोलीस दलात कर्तव्य बजावले.

त्यानंतर पो तीस सेवेता विराम देत महसुन सेवेत नायब तहसिलदार म्हणून पदार्पण केले. नंतर तहसीलदार या पदावर आल्यानंतर मला चांगले काम करण्याची संधी मिळाली. आता यापुढे अवैध उत्खनन, वाहतूक आणि विक्री थांबविण्याचे आव्हान आहे. त्याचप्रमाणे अनेक स्टोन क्रेलर चालक यांची नियमाप्रमाणे सुरू आहे का नाही तपासणी करण्यात येणार आहे असे श्री तहसीलदार चव्हाण म्हणाले. महाराष्ट्र शासनाची रॉयल्टी बुडवून स्वतःचे उखळ पांढरे करून घेत असल्याने त्यांच्यावरही कळक कारवाई करून महसूल वसूल करण्यात येणार आहे. त्यांनी प्रशिक्षण कालावधी पूर्ण केला. नांदेड येथे नायब तहसिलदार म्हणून प्रत्यक्ष कामाला सुरुवात केली. नंतर नांदेड जिल्ह्यातच नायब तहसीलदार म्हणून सेवा बजोली आहे. त्यानंतर छत्रपती संभाजी नगर येथे अप्पर तहसीलदार म्हणून होते आता ते अंबडचे नवीन तहसीलदार म्हणून प्रशासकीय कामाला त्यांनी सुरुवात केली आहे.

# एस.एम.देशमुख यांचा मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने सत्कार

वडवणी । प्रतिनिधी

मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस एम देशमुख हे गत तीन महिन्यांपूर्वी लंडन दौऱ्यावर गेले होते. ते मायदेशी परतल्यानंतर आपल्या देवडी गावी आले आहेत. वडवणी तालुका मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने त्यांचं फटाक्यांच्या आतिषबाजीत स्वागत करत यथोचित सत्कार करण्यात आला.

मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस एम देशमुख हे गत तीन महिन्यांपूर्वी लंडन दौऱ्यावर गेले होते. ते मायदेशी परतल्यानंतर आपल्या देवडी गावी आले असल्याची माहिती मिळताच वडवणी तालुका मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने विठ्ठल रुक्मिणी मंदिर प्रांगणात एका खास कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात देशमुख यांचं फटाक्यांच्या आतिषबाजीत स्वागत करत यथोचित सत्कार करण्यात आला. या वेळी देशमुख यांनी लंडन मधील आश्चर्यकारक



माहिती देत गत तीन महिन्यांत ज्या ठिकाणी त्यांनी भेटी दिल्या तेथील अनुभव शेअर केला. जवळपास दोन ते अडीच तास या मस्त पैकी गप्पा रंगल्या होत्या. सोमनाथ बडे, सुभाष वाव्हळ यांच्या सह उपस्थित पत्रकारांनी लंडन मधील आपल्या मनात असतील ते प्रश्न मांडले. देशमुख यांनी या महत्वपूर्ण प्रश्नांची उत्तरे देत तेथील अनुभव सर्वांबरोबर शेअर केला. या कार्यक्रमाला विश्वनाथ झाटे, मच्छिंद्र झाटे, विश्वास आगे, सुभाष वाव्हळ, अनिल वाघमारे, विनायक जाधव, सुधाकर पोटभरे, सतिश सोनवणे, महेश सदरे, ओमप्रकाश साबळे, धम्मपाल डावरे, वाजेद पठाण, संभाजी लांडे सह गावकरी व स्नेही मंडळी उपस्थित होते.

# मुख्याधिकारी यांच्या आश्वासनामुळे उपोषण मागे

अंबड । प्रतिनिधी

अंबड शहरात विशेष रस्ता अनुदान २०२१-२२ योजने अंतर्गत कॉन्ट्रॅक्टर यांनी शहरातील सिमेंट रस्त्याचे काम अत्यंत बोगस केले आहे. तरी संबंधीत गुत्तेदार, इंजिनिअर यांच्यावर कडक कार्यवाही करुन गुन्हे दाखल करण्यात यावे अशी मागणी करण्यात आली होती कारवाई ना केल्यामुळे नवीन नगरपरिषद समोर उपोषण करण्यात आले होते परंतु सदरील उपोषण मागे घेत नसल्यामुळे या उपोषण सोडण्यासाठी मुख्याधिकारी यांनी स्वतः तिथे जाऊन उपोषण मागे घेण्याची उपोषण धारकाला विनंती केली.

मुख्याधिकारी यांनी आश्वासन दिल्याने नंतर उपोषण मागे घेण्यात आले. विशेष रस्ता अनुदान २०२१-२२ योजने अंतर्गत अंबड शहरातील जालना-बीड रोड ते संदिप भैय्या आंधळे यांच्या घरा पर्यंत व हुतात्मा चौक ते पोलीस स्टेशन पर्यंत, सिमेंट रस्त्याचे काम करण्यात आले आहे. सदर काम हे पूर्णपणे बोगस झाले आहे. रस्त्याला पूर्णपणे चिरा/भेगा व



खडडे पडले आहें. रस्ता तयार होऊन तीन झाला नाही जेमतेम तीन महिने पण झाले नाही. तीन महिन्याच्या आंत पूर्ण रस्ता हा उघडलेला आहे. वर्क ऑर्डर व इस्टीमेट प्रमाणे काम झालेले नाही. वाळुचा वापर पण केलेला नाही. सदरील काम क्वॉलीटी कंट्रोल मार्फत चौकशी करुन गुत्तेदार, इंजिनिअर यांच्यावर कडक कार्यवाही करुन गुन्हे दाखल करण्यात यावे.

व त्यांच्याकडून नुकसान भरपाई वसुल करण्यात यावी. अशी मागणी करण्यात आली आहे. यासाठी अंबड येथे अमारण उपोषण करण्यात आले होते परंतु या प्रकरणी संबंधित गुत्तेदार यांना विचारले असता ते म्हणाले की मी नियमाप्रमाणे काम केले असून परंतु काही किरकोळ काम बाकी असेल तर मी करून देण्यास तयार आहे असे गुत्तेदार यांच्याकडून सांगण्यात आले. तसेच नगरपरिषद चे निवडणूक झाल्या नसल्यामुळे नगरसेवक व नगराध्यक्ष नसल्याने कामाकडे कोणाचाही लक्ष नसल्याने स्थानिक आमदार फक्त बघायचे भूमिका घेत आहे. तसेच टक्केवारीमुळे काम बोगस होत असल्याची चर्चा अंबड शहरात सुरू आहे.

# ई पिक पाहणीची अट रद्द करुन सरसकट अनुदान द्या- माजी आ. भीमराव धोंडे

म्हसोबावाडी । प्रतिनिधी

शेतकऱ्यांना मिळणाऱ्या विविध पिकांचे अनुदान मिळण्यासाठी इ. के. वाय. सी. ( ई पीक पाहणी ) ही अट रद्द करुन सरसकट अनुदान द्यावे, याबाबत जिल्हाधिकारी बीड यांची भेट घेणार आहे असे माजी आमदार भीमराव धोंडे यांनी सांगितले. माजी आमदार भीमराव धोंडे यांनी गेल्या एक महिन्यापासून आष्टी पाटोदा शिरूर विधानसभा मतदारसंघात जनसंपर्क अभियान सुरू केले आहे. गाव, वाड्या, वस्त्यांना भेटी देऊन सर्वसामान्य जनतेच्या समस्या जाणून घेत आहेत. प्रत्येक गावांमध्ये शेतकरी फक्त पिक विमा आणि अनुदान मिळाले नाही अशा तक्रारी करीत आहेत. निसर्गाच्या लहरीपणामुळे शेतकऱ्यांना कधी अतिवृष्टी तर कधी दुष्काळाशी सामना करावा लागतो त्यामुळे अनुदान व पिक विमा सहज मिळणे हे गरजेचे आहे. ज्या शेतकऱ्यांनी पिक नुकसानीच्या तक्रारी केल्या फक्त त्यांनाच पिक विमा मिळाला आहे. पिक विमा देखील पुर्वी प्रमाणे सरसकट मिळावा. तसेच वेगवेगळे अनुदान मिळण्यासाठी कृषी विभागाने ई पिक पाहणी



ही अनिवार्य केल्याने मतदारसंघातील अनेक शेतकरी अनुदानापासून वंचित आहेत. तसेच अनेक शेतकऱ्यांकडे अँड्रॉइड मोबाईल नसतात त्यामुळे ते ई पीक पाहणी करू शकत नाहीत, तसेच खेड्यापाड्यात मोबाईलला रेंज नसते तसेच सर्वर डाऊनचा प्रश्न अनेक ठिकाणी निर्माण झाल्याने शेतकरी ई पिक पाहणी करू शकले नाहीत. सरकारी अनुदान योजनेचा लाभ शेतकऱ्यांना सहजपणे मिळावा यासाठी कृषी विभागाने ई पीक पाहणी ही अट रद्द करावी.

आष्टी विधानसभा मतदारसंघातील सर्व सामान्यांच्या समस्या जाणून घेण्यासाठी माजी आ. भीमराव धोंडे यांनी शनिवारी दिनांक १७ ऑगस्ट रोजी जनसंपर्क अभियाना अंतर्गत आष्टी तालुक्यातील खुंटेफळ, सोलापुरवाडी, खरडगव्हाण, ठोंबळ सांगवी, हातोळण, बोरोडी, पारोडी, निमगाव बोडखा, घोंगडेवाडी,पुंडी, पिंपळगाव दाणी, मेहेकरी, आनंदवाडी, पिंपरी घुमरी, सराटे वडगाव , टाकळी अमिया या गावाचा दौरा केला. खुंटेफळ येथे बोलताना मा. आ. भिमराव धोंडे यांनी सांगितले की, वै. साहेबराव थोरवे दादा हे आमच्यासाठी प्रेरणास्थान आहेत. माझे खरे राजकीय मार्गदर्शक होते. मी मतदारसंघात वीस वर्षांत रस्ते व सिंचनाची शेकडो कामे केली आहेत. अलीकडील काळात प्रत्येक कामात १० टक्के कमिशन घेतले जाते. त्यामुळे चांगल्या दर्जाची कामे होत नाहीत. शेतकरी शिक्षण संस्थेचे माध्यमातून हजारो विद्यार्थी वेगवेगळ्या शाळेत शिकत आहेत. तसेच शिक्षण घेतलेले हजारो विद्यार्थी महाराष्ट्रात वेगवेगळ्या ठिकाणी नौकरी करीत आहेत तर शैक्षणिक संस्था मुळे गावागावात मुलींच्या शिक्षणाची सोय झाली आहे. लवकरच आष्टी येथे इंजिनीअरिंग कॉलेज सुरू करण्यात येणार आहे. मतदारसंघातील नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी मी कटीबद्ध आहे. मी २० वर्षात कधीही गुत्तेदारी केली नाही. निमगाव बोडखा येथील अखंड हरिनाम सप्ताहास मा. आ. भिमराव धोंडे यांनी भेट दिली. ॲड. हनुमंत थोरवे यांनी सांगितले की, सर्व जाती धर्माच्या लोकांना बरोबर घेऊन चालणारे नेतृत्व म्हणजे भिमराव धोंडे होय, तसेच विधानसभा सदस्य असताना त्यांनी मतदारसंघात अविस्मरणीय अशी अनेक विकासकामे केली आहेत. पुंडी येथे नानाभाऊ वाडेकर यांनी सांगितले की, भिमराव धोंडे यांनी मतदारसंघात शिक्षणाचे जाळे निर्माण केले आहे. पुंडी परिसरातील अनेक रसत्यांची कामे केली आहेत. दौऱ्याच्या निमित्ताने भाजपा युवा मोर्चाचे जिल्हा सरचिटणीस अजयदादा धोंडे,ॲड. भाऊसाहेब सायंबर, रंगनाथ बोडखे, हरिभाऊ जंजिरे,माजी सरपंच चंद्रशेखर साके, पांडुरंग गावडे व इतर कार्यकर्ते सोबत होते. वेगवेगळ्या ठिकाणी झालेल्या बैठकीस माजी जि. प. सदस्य दत्तोबा वाडेकर, अशोक येरकळ, ईश्वर गव्हाणे, चेअरमन भगवान शेळके पाटील, पांडुरंग जाधव,माजी सरपंच संजय कवडे, जालींदर रणसिंग, झुंबर शेंडगे, गणेश येरकळ, उपसरपंच गणेश थोरवे, हनुमंत थोरवे, युवानेते धैर्यशील थोरवे, रामभाऊ काकडे, अमोल थोरवे, नवनाथ आगाशे, देविदास थोरवे, रामहरी कर्डीले, महादेव मुंगसे, शंकर भांड, आण्णासाहेब थोरवे, माजी सरपंच आजिनाथ वायाळ ,बाबासाहेब थोरवे, मनसुक चौधरी, सरपंच ईश्वर मेटे, उदयभान वाळके, बलभीम अमृते,गुलाब लाळगे, किसन खताळ, भिमाजी शिंदे, ज्ञानदेव जाधव, दस्तगिर सय्यद, अंबादास कोरडे, पोपट गावडे, माजी सरपंच भिमराव परकाळे, पांडुरंग सायंबर, अमोल वाडेकर ,मच्छिंद्र सायंबर, सरपंच भाऊसाहेब गावडे, उपसरपंच सुभाष गावडे, निवृती माळशिखरे, चेअरमन गणेश माळशिखरे, श्रेयस माळशिखरे,माजी सरपंच सोपान झांजे, बळीराम झांजे, बापुराव नवसुपे, अशोक बायकर व इतर उपस्थित होते. ठिकठिकाणी पांडुरंग गावडे, सुभाष थोरवे, माजी उपसरपंच शंकर थोरवे, प्रमोद गव्हाणे, सोमनाथ शेलार, रोहिदास फरताडे, हभप जब्बार महाराज, अशोक माने, संदीप जगदाळे, नानाभाऊ वाडेकर व इतरांची भाषणे झाली. दिलीप गांगर्डे, माजी उपसरपंच आजिनाथ फरताडे, भिमराव साके, वसंत भागवत यांच्या निवासस्थानी भेटी दिल्या.

# जिवाचीवाडी-तुकूचीवाडी परिसरातील लोकांचे प्रेम पाहून भारावून गेलो -धनंजय मुंडे

## जिवाचीवाडी येथील लोकनेते स्व.गोपीनाथराव मुंडे प्रवेशद्वाराचे धनंजय मुंडे यांच्या हस्ते लोकार्पण

**केज । प्रतिनिधी**

बऱ्याच वर्षानंतर केज तालुक्यातील जीवाचीवाडी, तुकोजी वाडी आणि या परिसरात येण्याची संधी मिळाली. आज जागोजागी ग्रामस्थांनी मोठ्या उत्साहात आणि ज्या प्रेमाने माझे स्वागत केले ते प्रेम पाहून मी भारावून गेलो आहे. मुंडे कुटुंबावर असलेल्या या प्रेमातूनच आम्हाला जनतेची सेवा करण्याची ऊर्जा मिळते आणि ही ऊर्जा माझ्या शेवटच्या श्वासापर्यंत अशीच साठवून ठेवीन व आपली सेवा करत राहीन, असे वक्तव्य राज्याचे कृषिमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी जीवाचीवाडी व तुकोचीवाडी येथील ग्रामस्थांशी बोलताना केले आहे.

जिवाचीवाडी येथे उभारण्यात आलेल्या लोकनेते स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे प्रवेशद्वाराचे आज मंत्री धनंजय मुंडे यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले. यावेळी त्याांनी जीवाचीवाडी तसेच तुकोचीवाडी येथे सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताहास देखील भेट देत ग्रामदैवतांचे आशीर्वाद घेतले व गावकऱ्यांशी संवाद साधला.

धनंजय मुंडे हे केज तालुक्यातील जिवाची वाडी व तुकोची वाडी या गावांना भेट देण्यासाठी येत असताना धारूर तालुक्यातून केज तालुक्याच्या हद्दीत प्रवेश झाल्यानंतर तुकोजी वाडी येथे पोहोचेपर्यंत रस्त्याातील प्रत्योक गावागावात वस्ती वस्तीवर धनंजय मुंडे यांचे स्थानिक



ग्रामस्थांनी व माता-भगिनींनी स्वागत केले. घराघरांपुढे रांगोळ्या काढून तर औक्षण करून मायमाऊलींनी धनंजय मुंडे यांना भरभरून आशीर्वाद दिले.

### गावागावात ग्रामस्थ व माय-माऊल्या धनंजय मुंडे साहेबांच्या स्वागतासाठी रस्त्याावर; घरांपुढे रांगोळी अन औक्षण करून ओवाळणी


दरम्यान राज्य शासनाने नुकत्याच जाहीर केलेल्या सोयाबीन व कापूस उत्पादक शेतकऱ्यांना द्यावयाच्या लाभाच्या माहिती देण्यासह मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचे दोन हप्ते महिला भगिनींना पोहोचले आहेत का, असा प्रश्न धनंजय मुंडेंनी ग्रामस्थांशी सुरु संवादा दरम्यान विचारताच महिला भगिनींनी मोठ्या उत्साहात होय म्हणत शासनाचे आभार मानले.

पुढे बोलताना धनंजय मुंडे यांनी परळी वैजनाथ येथे येत्याा २१ तारखेपासून सुरू होत असलेल्या पाच दिवशीय राज्यस्तरीय कृषी महोत्सवास उपस्थित राहण्यासंदर्भात सर्व शेतकरी बांधवांना निमंत्रित केले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष विष्णू चाटे, रमाकांत मुंडे, विजयकांत मुंडे, मुरलीधर ढाकणे, सारंग आंधळे, नंदू दादा मोराळे, संजय केदार, बालाजी तांदळे, जीवाचीवाडी गावचे सरपंच बंडू चौरे, सत्यानारायण चौरे, नागझरीचे सरपंच चंद्रसेन चौरे, रोहित हंगे, किरण राऊत, हनुमंत चौरे, सुदर्शन घुले, रामदास चौरे, यांसह असंख्य कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते.

# तेलबिया मूल्य साखळी विकास योजने अंतर्गत भ्रष्टाचारा संदर्भात राज्यपाल, ईडी, सी बी आय, लोक आयुक्ताकडे तक्रार दाखल -मुंडे

परळी वैद्यनाथ । प्रतिनिधी

महाराष्ट्रा मधील त्रिमूर्ती सरकारच्या कृषी खात्याा अंतर्गत कापूस सोयाबीन तेलबिया मूल्य साखळी विकास योजने अंतर्गत शेतकऱ्यांना नॅनौ युरिया डीएपी फवारणी पंप डिजिटल सेन्सर कापूस साठवून गोण्या मेटाल्डीहाइड कीटकनाशके शासनाच्या योजनेद्वारे महाडीबीटी पोर्टलवर नोंद केलेल्या शेतकऱ्यांना पुरवले जातात त्याामध्ये कृषी खात्यााचे अप्पर मुख्य सचिव व्ही.राधा व अनुप कुमार यादव ,प्रवीण गेडाम आयुक्त कृषी यांनी कापूस सोयाबीन आणि तेलबिया मूल्य साखळी विकास योजनेला विरोध केला होता म्हणून त्याांच्या तात्काळ तडका फडकी बदल्या कृषीमंत्र्याांनी केल्या असा आरोप महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी ओबीसी विभागाचे प्रदेश उपाध्यक्ष वसंत मुंडे यांनी केला. या योजनेमध्ये १५० कोटी रुपयाचा भ्रष्टाचार झाल्याची तक्रार माननीय राज्यपाल, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणीस,ई डी, सीबीआय, लोकायुक्त, मुख्य सचिव, एसीबी, विधानसभेचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, नाना पटोले अध्यक्ष महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी यांच्याकडे काँग्रेसचे नेते वसंत मुंडे यांनी सर्व पुराव्यासहित तक्रार दाखल



केली असून तात्काळ चौकशीसाठी आदेश देण्याची मागणी केली आहे. कापूस सोयाबीन व तेलबिया मूल्यसाळी विकास योजने अंतर्गत गैरव्यवहारात कपाशीसाठी नॅनो डीएपी ३ कोटी ४५ लाख, कपाशीसाठी नॅनो युरीया १२ कोटी ९३लाख ७५ हजार, डिजिटल सेंसर ८ लाख ६१ हजार ४००, कापूस साठवण गोण्या ५२ कोटी ५३लाख २७ हजार २००, सोयाबीन साठी नॅनो डीएपी २३ कोटी २४ लाख ५० हजार, सोयाबीन साठी नॅनो युरिया ८ कोटी ७१ लाख ५० हजार, मेटाल्डीहाइड कीटकनाशक ११ कोटी १५ लाख, फवारणी पंप २६ कोटी ९१लाख ६८ हजार, या योजनेमधून पैसा हडप करण्यासाठी कृषी मंत्र्ाालयाच्या कार्यालयातून खाजगी सचिव कृषी आयुक्तालयातील माजी संचालक विद्यमान सहसंचालक कृषी उद्योग महामंडळातील एक महाव्यवस्थापक जबाबदार असून संगणमताने कंत्र्ााटदारा बरोबर आर्थिक व्यवहारासाठी नियम धाब्यावर बसवून १५० कोटीचा भ्रष्टाचार या अधिकाऱ्यांनी कंत्र्ााटदाराबरोबर संगणमत करून सोयीचे नियम बनवून मान्यता मिळवलेली आहे या संपूर्ण बाबीची चौकशी करून तात्काळ या योजनेमध्ये हेराफेरी करणाऱ्या अधिकाऱ्यावर मंत्री कार्यालयातल्या जबाबदार कर्मचाऱ्यावर कारवाई करण्याची मागणी शासनाकडे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी ओबीसी विभागाचे प्रदेश उपाध्यक्ष वसंत मुंडे यांनी पुराव्यासहित सादर केली आहे.

# शंभर निराधार वृद्धांची मोफत आरोग्य तपासणी

## मानवलोक/जन सहयोगचा स्वातंत्र्यदिनाचा उपक्रम

अंबाजोगाई । प्रतिनिधी

मानवलोक संस्थेच्या वतीने स्वातंत्र्यानिमित हाल अपेष्टात जीवन जगणाऱ्या जवळपास शंभर निराधार वृद्ध महिला व पुरुषांची मोफत आरोग्य तपासणी नुकतीच करण्यात आली

यावेळी व्यासपीठावर डॉ.मनिषा भुतडा,डॉ. अर्चना थोरात, डॉ.वासंती चव्हाण, डॉ.ज्योती डब्डे, कल्पना लोहिया,डॉ. विनायक गडेकर, अरूण आसरडोहकर,पत्रकार राहूल देशपांडे, सामाजिक कार्यकर्ते शाम सरवदे आदी उपस्थित होते. यावेळी प्रास्तविकात बोलताना कल्पना



लोहिया म्हणाल्या की, हाल अपेष्टात जीवन जगणाऱ्यांसाठी मानवलोक संस्था ही आधार असून दानशुरांच्या मदतीतून त्याांना किराणा साहित्याचे वितरण करण्यात येते तसेच त्याांचे आरोग्य चांगले रहावे यासाठी तपासणी करण्यात येऊन त्याांना औषध पुरवठा देखील करण्यात येतो.

डॉ.मनिषा भुतडा म्हणाल्या की,अधुनिक काळातील बदलत्याा जीवनशैलीमुळे सर्वांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम पान ३ वर

# नवनिर्वाचित विश्वस्त मंडळाच्या पाठपुराव्यामुळे पर्यटन विभागाकडून श्री योगेश्वरी देवल कमिटीस दोन कोटींचा निधी मंजूर

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

अंबाजोगाई शहराची ग्रामदेवता माता श्री योगेश्वरी देवल कमिटीच्या नवनिर्वाचित विश्वस्त मंडळाच्या अथक पाठपुराव्यामुळे माता श्री योगेश्वरी देवी मंदिर व परिसराच्या विकास कामासाठी पर्यटन व सांस्कृतिक विभागाकडून दोन कोटी रुपयांच्या निधी मंजूरीस नुकतीच प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. याबाबतचे मंजुरी पत्र पर्यटन व सांस्कृतिक विभागाच्या कडून देवल कमिटीस



प्राप्त झाले आहे. मंजूर निधीच्या माध्यमातून माता श्री योगेश्वरी देवी मंदिर व परिसराच्या ठिकाणी पायाभूत सुविधा पुरविण्यासाठी प्रादेशिक पर्यटन विकास योजनेंतर्गत सन २०२४-२५ मध्ये पर्यटन संचालनालयाची संबंधित कामांसाठी (रुपये २००.०० लक्ष ) दोन कोटी रकमेस या शासन निर्णयाव्दारे प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

मंजूर निधीच्या माध्यमातून श्री योगेश्वरी मंदिर व परिसरात धर्मशाळा, पालखी मार्ग, तसेच पार्किंग आदी कामांसाठी सदरील निधी वापरण्यात येणार असल्याचे देवल कमिटीचे पदसिध्द अध्यक्ष तथा तहसीलदार विलास तरंगे, उपाध्यक्ष राजकिशोर मोदी,तथा सचिव प्रा.अशोक लोमटे , सहसचिव संजय भोसले तथा कोशाध्यक्ष शिरीष पांडे यांच्यासह सर्व विश्वस्त मंडळाच्या वतीने सांगण्यात आले आहे.

देवल कमिटीच्या निधी मंजुरीसाठी कमिटीचे उपाध्यक्ष राजकिशोर मोदी यांनी शासनस्तरावर विशेष असा पाठपुरावा केला. या निधीसाठी जिल्ह्याचे पालकमंत्री तथा कृषिमंत्री पान ३ वर

# श्रावण पौर्णिमानिमित्त मौजे शिवणी येथे धम्मदेसना व सत्कार समारंभाचे आयोजन

**बीड । प्रतिनिधी**

महाविहार धम्मभूमी डॉ. भदन्त आनंद कौसल्यायन नगर मौजे शिवणी येथे सोमवार दि १९ ऑगस्ट रोजी दुपारी १२.०० वाजता करण्यात आले असून धम्मप्रेमी उपासक, उपासिका यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन प्रियदर्शी धम्मसंस्कार शिक्षण संस्था, बीड. वर्षावास संयोजन समिती मौजे शिवणी व शिवणी येथील समस्त बौद्ध उपासक उपासिका यांनी केले आहे.



सोमवार दि. १९ ऑगस्ट रोजी सकाळी १०.०० वाजता ऐतिहासिक बोधी वृक्षाची पुजा, सकाळी १० ते दुपारी १२ वाजता भोजनदान व खिरदान, दुपारी १२.०० वाजता त्रिसरण पंचशील बुद्ध वंदना, दुपारी १२.३० वाजता पाहुण्यांचे सत्कार, त्याानंतर पु. भिक्खु धम्मशील थेरो (हिंगोली/ बीड) यांचे मार्गदर्शन व प्रमुख धम्मदेसना होईल.

यावेळी कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून गौरव इंगोले (उपविभागीय अधिकारी माजलगांव), हिरामण उजगरे (सेवानिवृत्त दुय्यम निबंधक), उमेश नागदिवे (सहसंचालक तंत्ाशिक्षण विभाग छ.संभाजीनगर), प्रा.साहेबराव इंगोले (माजी उपप्राचार्य पिपल्स कॉलेज नांदेड) यांची उपस्थिती असणार आहे. याप्रसंगी सत्कार मूर्ती आयु. कल्याणराव भंडारे (सेवानिवृत्त पोलिस उपनिरीक्षक), आयु. मंगलताई सोनवणे (कनिष्ठ अभियंता ग्रामीण पाणीपुरवठा विभाग जिल्हा परिषद बीड) यांच्या सत्काराचे आयोजन करण्यात आले आहे.

पौर्णिमे निमित्त कालकथीत गयाबाई धोंडिराम वडमारे पान ३ वर

# मराठवाडा चेबर आँफ ट्रेड अँड काँमर्स कार्याकारणीवर माजलगावचे तीन सदस्यांची निवड

**माजलगाव । प्रतिनिधी**

महाराष्ट्र चेबर आँफ काँमर्स च्या मराठवाडयाच्या कार्यकारिणीवर माजलगावातील सदस्यांना स्थान प्राप्त झाले असुन मराठवाडा चेंबर आँफ ट्रेड अँड काँमर्स च्या वरिष्ठ उपाध्यक्ष सुरेंद्र रेदासनी यांची व सचिवपदी जफर मिर्झा तर कार्यकारिणी वर अनंत रुद्रवार यांची निवड झाली आहे.

मराठवाडा चेंबर आँफ ट्रेड अँड काँमर्स ची बैठक औरंगाबाद (संभाजीनगर) मध्ये महाराष्ट्र चेंबर आँफ काँमर्सचे माजी अध्यक्ष





मानसिंग पवार तर महाराष्ट्रा चेबरचे उपाध्यक्ष सत्यानारायण लाहोटी व चेंबर आँफ ट्रेड काँमर्सचे उपाध्यक्ष प्रफुल्ल मालाणी यांच्या प्रमुख उपस्थीत बैठक पार पडली या बैठकीत मराठवाडा चेबर आँफ ट्रेड अँड काँमर्स च्या अध्यक्षपदी आदेश पालसिंग छाबडा यांचे निवड झाली यांची निवड झाली या बैठकीस मराठवाड्यातील सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

या बैठकीत मराठवाडा पदाधिकारी कार्यकारिणीची निवड एकमताने पान ३ वर

# आज नाकाडेवाडी येथे श्री.खंडोबा मूर्ती प्राणप्रतिष्ठा व हनुमान मूर्ती स्थापना

पिंपळवंडी । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील पिंपळवंडी येथील ग्रुप ग्रामपंचायत अंतर्गत नाकाडेवाडी येथे आज दि.१९/०८/२०२४ सोमवार रोजी सकाळी श्री.खंडोबा मूर्ती प्राणप्रतिष्ठा व हनुमान मूर्तीची स्थापना श्री.ह.भ.प. गुरुवर्य महादेवानंदजी भारती महाराज मठाधिपती श्री.क्षेत्र अश्वत्थलिंग संस्थान पिंपळवंडी यांच्या शुभहस्ते संपन्न होत आहे.या कार्यक्रमाला पंचक्रोशीतील ग्रामस्थ व भाविक-भक्तांनी मोठ्या संख्येने येऊन लाभ घ्यावा असे आवाहन समस्त ग्रामस्थ नाकाडेवाडी यांनी केले आहे.यानिमित्त सकाळी ७ ते ११ दरम्यान महाप्रसाद व ११ ते १ या वेळेत किर्तन होणार आहे. या



कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती आ.बाळासाहेब आजबे,माजी आमदार सुरेश आण्णा धस,माजी आमदार भिमराव धोंडे तसेच विजय गोल्हार, माऊली आप्पा जरांगे,भाऊसाहेब भवर,चेअरमन शिवाजी पवार व सरपंच निलेश मोरे आदींची उपस्थिती लाभणार आहे.

# राहणीमान भत्ता, भविष्य निर्वाह निधीसाठी शिपायाचा आत्मदहनाचा इशारा

**पाटोदा । प्रतिनिधी**

किमान वेतनाच्या अतिरिक्त ग्रामपंचायत हिस्सा राहणीमान भत्ता,भविष्य निर्वाह निधी द्या नसता ग्रामपंचायत कार्यालयासमोर आत्मदहन करणार असे ग्रामपंचायतच्या शिपायाने इशारा देऊन खळबळ उडवून दिली आहे.

सविस्तर माहिती अशी आहे की, पाटोदा तालुक्यातील सोनेसावरगाव ग्रामपंचायत कार्यालयात भास्कर ज्ञानोबा वायबसे हे शिपाई या पदावर १ जानेवारी २०११ पासून कार्यरत असुन त्याांना कामगार कायद्यानुसार लागु असलेल्या किमान वेतनाच्या व्यतिरिक्त ग्रामपंचायत हिस्सा, राहणीमान भत्ता, भविष्य निर्वाह निधी८.३३% रक्कम आजतागायत दिलेली नाही. या संदर्भात वेळोवेळी पाठपुरावा करूनही दुर्लक्ष होत आहे. या निधी अभावी भास्कर वायबसे यांचे कुटुंब आर्थिक संकटात सापडले असून कुटुंबावर उपासमारीची वेळ आली असुन ग्रामपंचायत कर्मचारी हा स्थानिक स्वराज्य संस्थेचा एक अविभाज्य घटक असुन कायम शासन नियमाप्रमाणे



देय असलेल्या सर्व लाभापासून वंचित राहत असुन आजतागायतचा राहणीमान भत्ता ३.२७९२४ रू.व भविष्य निर्वाह निधीचे १ लाख ९०हजार रू.असा एकुण थक्कीत रक्कम ४ लाख ३६ हजार ९२४ रू असुन नियमानुसार पुर्ण देयके सोनेसावरगाव ग्रामपंचायतने दि.१९ ऑगस्ट पर्यंत न दिल्यास दि.२०ऑगस्ट रोजी सोनेसावरगाव ग्रामपंचायत कार्यालयासमोर सहपतीक आत्मदहन करणार असल्याचे निवेदन बीड जिल्ह्याचे पालकमंत्री मा.ना.धनंजय मुंडे साहेब, मा.बीड जिल्हाधिकारी बीड, मा.मुख्यकार्यकारी अधिकारी बीड,मा.गटविकास अधिकारी पाटोदा, मा.पोलीस निरीक्षक पाटोदा आदीं ठिकाणी देऊन इशारा दिला आहे.

# श्री क्षेत्र चारदरी : प्रा.ईश्वर मुंडे सेवेकरी

किल्ले धारूर । प्रतिनिधी

तालुक्यांतील बालाघाटांच्या डोंगर कुशीत वसलेले चारदरी हे गाव तेथील जागृत देवस्थान श्री हनुमान मंदिरामुळे चांगलेच प्रसिध्दीला आलेले असून भावीकांच्या श्रध्देचे ठिकाण बनले आहे. चारदरी येथील गावकरी व परिसरातील भक्तगण यांच्या सहकार्याने या तीर्थ क्षेत्रात सन १९७८ पासून प्रत्येक शनिवारी भावार्थ रामायण ग्रंथाचे वाचन व कथन केले जाते.

श्री क्षेत्र चारदरी येथे



जिल्हाभरातील नामांकीत शेकडो वाचक व सुचकांसह तीन ते चार हजार भाविक उपस्थीत राहातात या सर्वांना महा प्रसादाची महा पंगत दिली जाते. दि.१७ ऑगष्ट २०२४ शनिवारी ईश्वर शिक्षण संस्था गांजपूर चे सचिव तथा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या सेवा निवृत्त अधिकारी कर्मचारी सेल चे राज्य प्रमुख प्रा.ईश्वर आनंदराव मुंडे यांनी श्री क्षेत्र चारदरी येथे येऊन श्री हनुमान यांचे दर्शन घेऊन भावार्थ रामायणाचे वाचन केले.या वेळी सुचक म्हणून चारदरी चे भुमीपुत्र ह.भ.प.बाबासाहेब मुंडे महाराज होते. या वेळी प्रा.ईश्वर मुंडे यांनी सर्व भावीकांच्या सोबत पंगतीत बसून महा प्रसाद सेवन केला.नंतर दुसऱ्या पंगतीला महा प्रसाद घेणाऱ्या भावीकांना स्वत:च्या हाताने वाढ करून सेवा केली.

# प्रशासनाच्या आदेशाला दिंद्रुडकरांची साथ; दिंद्रुडचे ते उपोषण तूर्तास स्थगित

**दिंद्रुड । प्रतिनिधी**

माजलगाव तालुक्यातील दिंद्रुड येथील बाजारतळावर असलेला वाद विकोपाला गेल्याने दिंद्रुड ग्रामस्थांच्या वतीने स्वातंत्र्य दिनापासून आमरण उपोषणास सुरुवात केली होती. तीन दिवस उपोषण चालू असताना दिंद्रुडच्या व्यापाऱ्यांनी बेमुदत बंद ठेवत प्रशासनाला वेठीस आणले होते. शनिवारी रात्री माजलगाव तहसील प्रशासनाने उपोषणार्थींना उचित असलेला एप्रिल महिन्यातील




आदेश परत निर्गमित केल्याने माजलगाव महसुल प्रशासनास ग्रामस्थांनी तुर्तास उपोषण मागे घेत साथ देत लवकरात लवकर या विषयावर तोडगा काढण्यासाठी विनंती केली.

दिंद्रुड च्या बाजार तळावर मुस्लिम समाजाने अनधिकृत फेर ओढत कब्रस्तान तयार केले आहे. यामुळे दिंद्रुड च्या बाजारात बाजार राहट करणाऱ्या व्यापारी व ग्राहकांना त्रास होत असल्याने नागरिकांनी माजलगाव तहसील ला प्रकरण दाखल केले आहे. सहा महिने याप्रकरणी सुनावण्या होऊन निकालाची अपेक्षा असताना माजलगाव तहसीलच्या तत्कालीन तहसीलदार वर्षा मनाळे पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# नितेश राणे गो बॅक.. हिंदू जनआक्रोश मोर्चात घुसले मराठा आंदोलक, १० जण पोलिसांच्या ताब्यात

**पुणे । प्रतिनिधी**

भाजप आमदार नितेश राणे यांनी हिंदुत्त्वाच्या मुद्द्यावरुन सध्या जोरकसपणे आवाज उठवला आहे. काही दिवसांपूर्वी त्यांनी पोलिसांबद्दल केलेल्या विधानावरुन राज्यातील पोलीस कर्मचाऱ्यांनी नाराजी व्यक्त केली होती. मात्र, काही पोलिसांकडून हिंदूंना डावललं जात असल्याचं सांगत नितेश राणेंनी आपली भूमिका स्पष्ट केली होती. सध्या हिंदू जनआक्रोश यात्रेच्या माध्यमातून ते दौरा करत आहेत. पुणे जिल्ह्यातील इंदापूरमध्ये भाजप आमदार नितेश राणे यांच्या प्रमुख उपस्थितीत हिंदू जन आक्रोश मोर्चाचं करण्यात आलं होतं. मात्र, त्यांच्या यात्रेला विरोध करत मराठा आंदोलकांनी घोषणाबाजी केली. एक मराठा, लाख मराठा अशी घोषणाबाजी करत राणेंच्या यात्रेला विरोध केल्याचं दिसून आलं. यावेळी, पोलिसांनी आंदोलकांना ताब्यात घेतलं आहे.



शहरातील छत्रपती शिवाजी महाराजांचे आजोबा वीरश्री मालोजीराजे भोसले यांच्या इंदापूरमधील गढीवरील अतिक्रमण हटवण्यासाठी हिंदू जनआक्रोश मोर्चा काढण्यात आला. त्यामध्ये आमदार नितेश राणे, ह.भ.प.संग्राम बापू भंडारे पाटील, सागर भैया बेग यांच्या उपस्थितीत हा मोर्चा काढण्यात आलाय. मात्र, या मोर्चादरम्यान काही मराठा आंदोलकांनी मनोज जरांगे पाटील यांच्या नावाने घोषणाबाजी करत यात्रेला विरोध केला आहे. एक मराठा लाख मराठा मनोज जरांगे तुम आगे बढो हम तुम्हारे साथ है.. नितेश राणे गो बॅक, अशा घोषणा आंदोलकांनी दिल्या. छत्रपती शिवाजी महाराजांचे आजोबा सरदार वीरश्री मालोजीराजे भोसले यांच्या पुणे जिल्ह्यातील इंदापूर शहरात असलेल्या ऐतिहासिक गढीवरील झालेले अतिक्रमण हटवण्यासाठी आमदार नितेश राणे यांच्या उपस्थितीत हिंदू जन आक्रोश मोर्चा निघाला असून याला सकल मराठा समाजाच्या कार्यकर्त्यांनी कडाडून विरोध दर्शवला. राणे यांचा मोर्चा नेहरू चौकातून मुख्य बाजारपेठेत आल्यानंतर छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याकडे सकल मराठा समाजाचे आंदोलक जात असताना त्यांना पोलिसांनी अडवले. तसेच, जवळपास दहा आंदोलकांना ताब्यात देखील घेतले आहे. आश्रम फरतडे नावाच्या सकल मराठा क्रांती मोर्चाच्या कार्यकर्त्याला ताब्यात घेतले. तसेच, इंदापूर नगरपरिषदेसमोर सुरू असलेल्या हिंदु जन आक्रोश मोर्चा सभा सुरू असताना प्रेक्षकात बसलेल्या कार्यकर्त्यांनी घोषणाजीह केली.

**इंद्रेश्वर मंदिरात राणेंनी केली महाआरती**

राणे यांनी इंदापूरचे ग्रामदैवत असलेल्या इंद्रेश्वर मंदिरात जाऊन इंद्रेश्वर महादेवाची पूजा करतो करत इंद्रेश्वर महादेवाचे महाआरती देखील राणे यांच्या उपस्थितीत पार पडली आहे. त्यानंतर जय श्रीराम चा नारा देत हा मोर्चा इंदापूर शहरातील नगरपरिषदे समोरील मैदानात दाखल झाला आहे या ठिकाणी राणे यांची जाहीर सभा पार पडणार आहे. दरम्यान या मोर्चाला सकल मराठा समाज तसेच विविध सामाजिक संघटना आणि राजकीय विरोध दर्शवलेला आहे त्यामुळे इंदापूर शहरात पोलिसांचा तगडा बंदोबस्त तैनात आहे.

# 'खडकी शिक्षण संस्थेची प्रतिमा उंचाविण्यात माजी विद्यार्थ्यांचे कार्य उल्लेखनीय'-कृष्णकुमार गोयल

**पुणे । प्रतिनिधी**

खडकी शिक्षण संस्थेची प्रतिमा उंचाविण्यात माजी विद्यार्थ्यांचे कार्य उल्लेखनीय ठरत आहे. या संस्थेच्या टिकाराम जगन्नाथ महाविद्यालयातील माजी विद्यार्थी सामाजिक ,राजकीय, प्रशासकीय, कला, क्रीडा अशा सर्व क्षेत्रात कार्यरत असून ही अभिमानास्पद बाब आहे, असे मत खडकी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष कृष्णकुमार गोयल यांनी व्यक्त केले.

टिकाराम जगन्नाथ महाविद्यालयाच्या स्थापनेला चाळीस वर्षे पूर्ण झाल्याने माणिक महोत्सवी वर्षाच्या सांगता समारोपप्रसंगी ते बोलत होते. यावेळी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. अरुण अडसूळ, सचिव आनंद छाजेड, सहसचिव तथा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय चाकणे आदींसह अन्य मान्यवर उपस्थित होते.



चाळीस वर्ष सेवा केलेल्या सर्व प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी व माजी विद्यार्थ्यांचा विशेष सत्कार यावेळी करण्यात आला. विशेष अंकाचे प्रकाशन प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले.

विद्यार्थ्यांची जडण घडण ज्या महाविद्यालयाने केली, ज्या वास्तूने संस्कार केले, आपले भवितव्य घडविले, समाजामध्ये सन्मानाचे स्थान दिले त्या महाविद्यालयाच्या विकासाकरिता माजी विद्यार्थ्यांनी नेहमी पुढाकार घेतला पाहिजे, असेही कृष्णकुमार गोयल यांनी सांगितले.

संस्थेची खरी ओळख ही माजी विद्यार्थ्यांवरून होत असते. हॉकी या खेळाला महाविद्यालयाने आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचविले आहे, असे नमुद करत डॉ. अरुण अडसूळ यांनी महाविद्यालयामधून उच्च शिक्षण घेऊन वरिष्ठ पदावर पोहचलेल्या विद्यार्थ्यांचे कौतुकही केले. प्राचार्य डॉ.संजय चाकणे यांनी विद्यार्थ्यांच्या उज्वल भवितव्याशी निगडित शैक्षणिक उपक्रमाची माहिती दिली. आनंद छाजेड यांनी गरीब गरजू विद्यार्थ्यांना मदतीचे आवाहन केले. सूत्रसंचालन विजया चव्हाण यांनी केले. आभार शरद बोटेकर यांनी मानले. कार्यक्रमाच्या नियोजनामध्ये कनिष्ठ महाविद्यालयातील विजय लोंढे,रमेश लोंढे, दिशा वांबुरकर, कल्याण काळे, नितीन पैलवान यांनी विशेष परिश्रम घेतले

# भाजी विक्रेत्या दाम्पत्याचा मुलगा बनला पोलीस उपनिरीक्षक

**आंबेगाव । प्रतिनिधी**

निरगुडसर येथील भाजी विक्रेत्या दाम्पत्याचा मुलगा प्रशांत बबन दांगट हा प्रतिकूल परिस्थितीवर मात करत पोलीस उपनिरीक्षक झाला,त्याबद्दल निरगुडसर गावाने जंगी मिरवणूक काढत कौतुक सोहळा साजरा केला.



निरगुडसर येथील बबन व संगीता दांगट या भाजी विक्रेत्या दाम्पत्याचा प्रशांत हा मुलगा,प्रशांत पोलिस उपनिरीक्षक बनल्याने मित्रपरिवार,श्रीराम प्रतिष्ठान निरगुडसर,गावकऱ्यांनी एकत्र येत त्याची गावातून जंगी मिरवणूक काढली.कुठलाही क्लास न लावता त्याने मिळवलेले यश अनेकांसाठी प्रेरणादायी असल्याने निरगुडसर ग्रामपंचायत,शालेय व्यवस्थापन समिती निरगुडसर,पंडित जवाहरलाल नेहरू विद्यालय व दत्तात्रय गोविंदराव वळसे पाटील महाविद्यालय,जिल्हा परिषद प्राथमिक शाळा निरगुडसर यासह विविध ठिकाणी प्रशांत दांगट यांचा सत्कार व सन्मान करण्यात आला. त्यानंतर प्रशांत दांगट सदस्य असलेल्या श्रीराम प्रतिष्ठान व गावकऱ्यांनी (ता.१५) ऑगस्ट रोजी जंगी मिरवणूक काढली या मिरवणुकीचे नियोजन श्रीराम प्रतिष्ठान निरगुडसर यांच्या वतीने करण्यात आले होते,यावेळी निरगुडसर,मेंगडेवाडी गावातील ग्रामस्थ,महिला,तरुण मोठ्या संख्येने उपस्थित होते.फोटो खाली ओळ:निरगुडसर (ता.आंबेगाव):भाजी विक्रेत्या दाम्पत्याचा मुलगा पोलीस उपनिरीक्षक झाल्याने गावाने जंगी मिरवणूक काढली.

# जाब विचारल्याच्या कारणावरून एकास मारहाण

**पुणे । प्रतिनिधी**

घरासमोर दारूची बाटली फोडण्याचा जाब विचारल्याच्या कारणावरून चार जणांनी मिळून एका व्यक्तीला मारहाण केली. ही घटना शुक्रवारी (दि. १६) दुपारी तीन वाजताच्या सुमारास पीडब्ल्यूडी मैदान, नवी सांगवी येथे घडली.




रामा साहेबा पवार (वय ५५, रा. पीडब्ल्यूडी मैदान, नवी सांगवी) यांनी याप्रकरणी सांगवी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार उत्तम जाधव (वय ५०, रा. दापोडी), लखन दांडेकर (वय ६०, रा. पिंपळे गुरव), अर्जुन जाधव (वय २०), किरण जाधव (वय २४, रा. दापोडी) यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपींनी फिर्यादी यांच्या घरासमोर येऊन दारूची बाटली फोडली. त्यामुळे फिर्यादी यांनी आरोपींना त्याचा जाब विचारला. त्या कारणावरून लखन दांडेकर याने फिर्यादीस शिवीगाळ करून दगडफेक केली. त्यामध्ये फिर्यादी यांच्या पत्नीच्या बोटाला दुखापत झाली. त्यानंतर आरोपींनी फिर्यादीस शिवीगाळ करून हाताने मारहाण केली. सांगवी पोलीस तपास करीत आहेत.

# मी शब्दाचा पक्का,विरोधकांच्या भुलथापांना बळी न पडता महायुतीला साथ द्या-अजित पवार

**मंचर । प्रतिनिधी**

येथील महिलांची विक्रमी गर्दी प्रथमच पहात आहे. मुख्यमंत्री लाडकी बहिण योजनेचा लाभ महिलांना मिळण्यास सुरुवात झाली आहे. लोकसभा निवडणुकीत विरोधकांनी संविधान बदलणार, आरक्षण जाणार त्यामुळे सवलती जाणार असा खोटा प्रचार केला. तसाच अपप्रचार लाडकी बहिण योजनेबाबतही करत आहेत. विरोधकांना बोलण्यासारखा मुद्दा नाही. महायुतीचे सरकार पुन्हा सत्तेवर आल्यानंतर पुढील पाच वर्ष ही योजना सुरु राहील. कारण मी दिलेल्या शब्दाचा पक्का आहे. हे संपूर्ण राज्याला माहित आहे. विरोधकांच्या भूलथापांना बळी न पडता महायुतीला साथ द्यावी. असे आवाहन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले.



मंचर (ता.आंबेगाव) येथे रविवारी (ता.१८) राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातर्फे आयोजित केलेल्या सन्मान यात्रा व शेतकरी मेळाव्यात पवार बोलत होते. यावेळी प्रदेश अध्यक्ष खासदार सुनील तटकरे,वळसे पाटील, माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील, पोपटराव गावडे, देवेंद्र शहा, विष्णू हिंगे, बाळासाहेब बेंडे, पूर्वा वळसे पाटील,विवेक वळसे पाटील, मानसिंग पाचुंदकर, विवेक वळसे पाटील, प्रदीप वळसे पाटीलअरुण गिरे,प्रकाश पवार उपस्थित होते.पवार म्हणाले येथील जनता भाग्यवान आहे. प्रशासनाचा प्रदीर्घ अनुभव असलेले अभ्यासू व कर्तुत्ववान नेतृत्व मिळाले आहे. यापुढेही गतिमान पद्धतीने विकासकामे होण्यासाठी राज्यात प्रथम क्रमांकाच्या मताधिक्याने वळसे पाटील यांना निवडून द्या. वळसे पाटील म्हणाले शेतीपंपाना दिवसा वीज दिली जाईल.मंचर उपजिल्हा रुग्णालयात सिटीसस्कॅन, डायलिसीस मोफत सुविधा आहे. मंचर येथे महिलांसाठी स्वतंत्र रुग्णाल सुरु केले जाईल. शासकीय अभियांत्रिकी महविद्यालयातील अनेक मुले परदेशात उच्च पदावर काम करतात. येत्या पाच वर्षात ६५ कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्यांचा समावेश कुकडी प्रकल्पात केला जाईल. सातगाव पठार पाणीयोजना, म्हाळसाकांत, बोरघर, फुलवडे, केंदूर-पाबळ परिसरासाठी शेतीला पाणी कामे मार्गी लावली जातील.

# बालेवाडीत घरकाम करणाऱ्या सेवकांसाठी कार्यशाळा

**बालेवाडी । प्रतिनिधी**

येथील कुणाल अस्पायर एफ विंग येथे घरकाम करणाऱ्या सेवकांसाठी आर्थिक व्यवस्थापनाविषयी एक व्यापक कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. जवळपास ५० सेवकांनी यात सहभाग घेतला होता, ज्यामध्ये त्यांना आपल्या मेहनतीने मिळविलेल्या पैशांचे योग्य व्यवस्थापन करण्याविषयी आवश्यक माहिती देण्यात आली.

कार्यक्रमाची सुरुवात विंगमधील स्वयंसेवकांनी सादर केलेल्या एका प्रबोधनात्मक नाटकाने झाली. ज्यामध्ये चिटफंडसारख्या अविश्वसनीय आणि अव्यवस्थित आर्थिक योजनांमध्ये गुंतवणूक करण्यापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न करण्यात आला. या नाटकाने अशा गुंतवणुकीचे धोके प्रभावीपणे दाखवून दिले. तसेच, सुरक्षित, विश्वसनीय आर्थिक पर्याय शोधण्यास प्रवृत्त केले.

कार्यक्रमातील एक महत्त्वाचा भाग होता, जो हकदर्शक ॲपच्या प्रतिनिधीने घेतला. त्यांनी उपस्थित सेवकांना विविध सरकारी योजनांविषयी सखोल माहिती दिली. या सत्रात आयुष्यमान भारत, प्रधानमंत्री जनधन योजना, सुकन्या समृद्धी योजना, आणि लाडकी बहीण योजना यांसारख्या विविध योजनांची चर्चा करण्यात आली. उपस्थित सेवकांना त्यांच्या आर्थिक भविष्यासाठी योग्य निर्णय घेण्याची क्षमता प्रदान करणे, असा त्या मागचा उद्देश होता.

# विधानसभा निवडणुकीत मतदानासाठी २० ऑगस्ट पर्यंत नोंदणीची संधी

**पुणे । प्रतिनिधी**

भारत निवडणूक आयोगाच्या विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रमानुसार (झीपिश) जिल्ह्यात ६ ऑगस्ट रोजी प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे. १ ऑक्टोबर २०२४ रोजी वयाची १८ वर्ष पूर्ण होणाऱ्या व मतदार यादीत अद्यापपर्यंत नाव न नोंदविलेल्या नागरिकांनी त्वरित आपले नाव मतदार यादीत नोंदवून लोकशाहीच्या बळकटीकरणासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी केले आहे.



निवडणूका पारदर्शक आणि न्याय वातावरणात पार पाडयासाठी मतदार याद्यांचे अद्ययावतीकरण, शुद्धीकरण अत्यंत महत्त्वपूर्ण असते. यासाठी भारत निवडणूक आयोगाकडून विशेष संक्षिप्त पुर्नरिक्षण कार्यक्रम (दुसरा) राबविला आहे. ६ ऑगस्ट रोजी मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाच्या संकेतस्थळावर आणि मतदार नोंदणी अधिकारी यांच्या कार्यालयामध्ये प्रारूप यादी प्रकाशित करून यंदाच्या विशेष संक्षिप्त पुर्नरिक्षण कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात आला आहे. हा कार्यक्रम २० ऑगस्ट २०२४ पर्यंत राबविला जाणार आहे. नागरिकांना या मुदतीपर्यंत मतदार नोंदणी करता येणार आहे.

प्रारूप यादीमध्ये मतदारांनी आपले नाव आहे किंवा नाही याची खात्री करणे आवश्यक आहे. बऱ्याच वेळा ऐन मतदानाच्या दिवशी आपले नाव मतदार यादीमध्ये नाही अशी तक्रार अनेक मतदारांकडून केली जाते. तसेच मतदारांनी आपले नाव, पत्ता, लिंग, जन्म दिनांक, वय, ओळखपत्र क्रमांक, मतदारसंघ इत्यादी तपशील देखील अचूक असल्याबाबत खात्री करणे आवश्यक आहे. १ ऑक्टोबर २०२४ रोजी किंवा त्याआधी १८ वर्षे पूर्ण होणाऱ्या नागरिकांना या कालावधीत मतदार नोंदणी करता येणार आहे. तसेच ज्या मतदारांची नावे वगळली गेलेली आहेत अथवा ज्यांची नावे मतदार यादी मध्ये नाहीत अशा सर्व नागरिकांनी नमुना अर्ज क्रमांक ६ भरून आपली नावे मतदार यादीत समाविष्ट करावीत.

ऑनलाईन मतदार नोंदणीसाठी मतदारांनी https:// voters.eci.gov.in हे संकेतस्थळ तर आपली नावे मतदार यादीमध्ये शोधण्यासाठ>r https:// ceoelection.maharashtra.gov.in या संकेतस्थळाचा वापर करावा. मतदार यादीसंदर्भात काही माहिती आवश्यक असल्यास अथवा काही दुरूस्ती असल्यास जिल्हा निवडणूक कार्यालयात तसेच संबंधित सहायक मतदार नोंदणी अधिकारी यांच्या कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा निवडणूक शाखेतर्फे करण्यात आले आहे.

# पुण्यासह पिंपरी चिंचवडमध्ये मुसळधार पाऊस

**पुणे । प्रतिनिधी**

रविवारच्या सुट्टी निमित्त बाहेर पडलेल्या पुणेकरांची आणि पिंपरी चिंचवडकरांची तारांबळ उडाली. अचानक आलेल्या मुसळधार पावसाने नागरिकांची धावपळ झाली. शनिवारी रात्रभर पाऊस पडला. परंतु, सकाळ पासून विश्रांतीवर गेलेल्या पावसाने अचानक सुरुवात केली. त्यामुळे रस्त्यावर पाणीही साचले आणि वाहतूक कोंडीचा देखील सामना करावा लागला. विविध ठिकाणी पुरसदृश्य पाणी साचल्याचे देखील आढळून आले. तर संपूर्ण पूर्व पुण्यात मुसळधार पाऊस झाला असून हडपसर, मगरपट्टा, कोंढवा, पाषाण, कात्रज, पेठ भागात, शिवाजीनगर, कोथरूड, स्वारगेट, डेक्कन, बिबवेवाडी, शनी नगर, उंड्री, कल्याणी नगर,, सिंहगड रोड, धायरी येथे पावसाचा जोर वाढला आहे. तर पिंपरी चिंचवड येथे



देखील मुसळधार पाऊस झाला आहे. आयएमडीच्या अंदाजानुसार १९, २० ऑगस्ट रोजी पुण्यात गडगडाटासह दुपारनंतर पाऊस पडण्याची शक्यता आहे.

# वळती येथे दुसरा बिबट्या जेरबंद

**पुणे । प्रतिनिधी**

वळती (ता.आंबेगाव) येथील बिघे मळ्यात लावलेल्या पिंजऱ्यामध्ये एक वर्षाच्या बिबट्याला पकडण्यात वनविभागाला यश आले आहे. सात दिवसांपूर्वी याच ठिकाणी बिबट्या पकडला होता. रविवारी (ता.१८) पहाटे पुन्हा एकदा दुसऱ्या बिबट्याला जेरबंद करण्यात आला.



मागील काही दिवसात वळती परिसरात पाळीव प्राण्यांवर सतत बिबट्यांचे होणारे हल्ले तसेच दिवस-रात्र बिबट्याचे नागरिकांना होत असलेल्या दर्शनामुळे परिसरात भीतीचे वातावरण पसरले होते. यावेळी वळती येथील बिघे मळ्यातील मारुती भोर यांच्यासह ग्रामस्थांनी पिंजरा लावण्याची मागणी वनविभागाकडे ग्रामपंचायतीच्या पत्राद्वारे केली होती. त्यानुसार ४ ऑगस्ट रोजी पहिल्यांदा पिंजरा लावण्यात आला परंतु बिबट्या आठ दिवस पिंजऱ्याला हुलकावणी देत होता अखेर (ता.१२) रोजी पहाटेच्या सुमारास पहिला बिबट्या जेरबंद झाला होता परंतु याच परिसरात अजून बिबटे असल्याने वनविभागाने याच ठिकाणी पुन्हा पिंजरा लावला होता. अखेर दुसरा बिबट्या वनविभागाने लावलेल्या पिंजऱ्यात अडकला. वनपरिक्षेत्र अधिकारी स्मिता राजहंस यांचा मार्गदर्शनाखाली वनविभागाचे अधिकारी, कर्मचारी, रेस्क्यू टीम यांच्या मदतीने ताब्यात घेऊन त्याची माणिकडोह निवारा केंद्रात दाखल करण्यात आला आहे स्थानिक रहिवाशांनी सांगितले. दरम्यान, बिबट्यांचाही बंदोबस्त करण्याची मागणी धोंडीभाऊ भोर,आनंद वाव्हळ, बाळासाहेब लोखंडे, वसंत लोखंडे, मारुती भोर भाऊसाहेब जुंद्रे यांनी केली आहे.

# घरासमोर गांजा ओढणाऱ्या सराईतांना हटकल्याने दुचाकींची जाळपोळ

**पुणे । प्रतिनिधी**

घरासमोर गांजा ओढणाऱ्या सराईतांना हटकल्याने दुचाकींची जाळपोळ केल्याची घटना नगर रस्त्यावरील वाघोली भागात घडली. याप्रकरणी चौघांविरुद्ध लोणीकंद पोलिसांनी गुन्हा दाखल केला.

याप्रकरणी गणेश दांडे, श्रृतिक येरकर, सूरज पवार, समीर पिल्ले यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. याबाबत सुधीर लक्ष्मण पेटकर (वय ३४, रा. वाघोली, नगर रस्ता) यांनी लोणीकंद पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

दांडे, येरकर, पवार, पिल्ले पेटकर यांच्या घराच्या परिसरात गांजा ओढत होते. पेटकर कुटुंबीयांना त्रास झाल्याने त्यांनी आरोपींना गांजा ओढू नका, असे सांगितले होते. शनिवारी मध्यरात्री पेटकर कुटुंबीय गाढ झोपेत होते. त्यावेळी घराच्या परिसरातून जळण्याचा वास आला. पेटकर यांनी घराबाहेर डोकावून पाहिले. तेव्हा दुचाकी पेटवल्याचे लक्षात आले. त्यानंतर स्थानिक रहिवाशांनी पाणी ओतून आग आटोक्यात आणली. या घटनेची माहिती लोणीकंद पोलिसांना देण्यात आली. घरासमोर गांजा ओढण्यास मनाई केल्याने आरोपींनी दुचाकी पेटविल्याचे पेटकर यांनी पोलिसांना सांगितले.

# डॉ. आंबेडकर वसतिगृहाचा होणार पुनर्विकास

**पुणे । प्रतिनिधी**

घोले रस्ता येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर वसतिगृहातील दोन विद्यार्थ्यांचा डेंगूमुळे मृत्यू झाला. तसेच सुमारे ३० ते ४० विद्यार्थांना या आजाराची लागण झाल्याचा प्रकार नुकताच घडला आहे. या प्रकरणानंतर महापालिकेच्या वरिष्ट अधिकाऱ्यांनी केलेल्या तपासणी वसतिगृहाची मोठया प्रमाणात दुरावस्था झाल्याचे समोर आल्यानंतर या वसतिगृहाचा पुनर्विकास केला जाणार आहे.



या बाबतचा प्रस्ताव सादर करण्याचे आदेश अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी. यांनी महापालिकेच्या बांधकाम विभागास दिले आहेत. विशेष म्हणजे, महापालिकेकडून या वसतिगृहाच्या देखभाल दुरुस्तीसाठी दरवर्षी मोठ्या प्रमाणात निधी खर्च केला जातो.

त्यानंतरही येथे दारे, खिडक्या, इमारतीची अनेक भागात दुरवस्था झालेली आहे. त्यामुळे जुनी इमारात पाडून नवीन सुसज्ज वसतिगृह उभारले जाणार असल्याचे अतिरिक्त आयुक्तांनी स्पष्ट केले.

वसतिगृह पुनर्विकासाबाबत लवकरच निर्णय घेऊन तातडीने हे काम सुरू केले जाणार आहे. त्यामुळे मुलांची गैरसोय टाळण्यासाठी परिसरातच मनपा शाळा अथवा एखाद्या इमारतीमध्ये मुलांची निवास व्यवस्था केली जाणार आहे. अथवा मुलांना तात्पुरत्या स्वरूपात प्रत्येक महिन्यासाठी राहण्याचे आणि जेवणाचा खर्च डीबीटी'द्वारे देण्याचे प्रशासनाचे नियोजन आहे. तसेच कमीत कमी कालावधीत हे काम पूर्ण करून या वसतिगृहाची क्षमता वाढविण्याचेही प्रशासनाचे नियोजन आहे.